आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ जून २०१२ | वर्ष २९ | अंक ६

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



# परिस्थिती शेती आणीबाणीची

शेतकऱ्यांच्या दररोज होत असलेल्या आत्महत्या हा आता शहरी लोकांच्या लेखी दखलपात्र विषय राहिलेला नाही. त्यांच्यासाठी जाहीर होणाऱ्या कोटी कोटींच्या आर्थिक पॅकेजेसमुळे उलट ते असूयेचाच विषय बनले आहेत; परंतु मुळात शेतकऱ्यांवर ही पाळी का येते, याच्या खोलात कुणीही शिरू मागत नाही. आज शेती बिलकूल परवडेनाशी झाली आहे. नाइलाजास्तव, दुसरा पर्यायच उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना ती करावी लागते. भविष्यात शेती टिकवायची असेल तर शेतकऱ्यांची अक्षम्य उपेक्षा, त्यांचं भयावह जिणं संपवायला हवं. याकरता शेती-आणीबाणीच लागू करायला हवी.

– विनय हर्डीकर

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक ६ । २१ जून २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठावरील छायाचित्र
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.





# अंतरंग


आजकाल
**बुडणाऱ्या जहाजावरील उंदरांची पळापळ**
**पश्चिम घाट अहवालाचा अजब गोंधळ**
ज्ञानेश्वर शेलार ........ ३

विचार
**परिस्थिती शेती आणीबाणीची!**
विनय हर्डीकर ........ ६


मिरचीचं खळं
**कहती है बुढीया**
बाबू सोंगाड्या ........ ११

कॉमन नॉन सेन्स
**विकासाच्या वाटेवर स्वयंसेवी काटे**
**शेतकरी आंदोलनाला बीटीचा अपघात**
सुधाकर जाधव ........ १२

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १५

# गोड साखरेची कडू कथा

महाराष्ट्राचे सहकार मंत्री, मुख्यमंत्री आणि इतर मान्यवरांनी सी. रंगराजन समितीसमोर साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याची गळ घातली आहे. ही बातमी वाचून काय म्हणावं? तेच कळेना. काळाची चक्र उलटी फिरली, असं जे म्हणतात. तसंच काहीतरी घडलं आहे. साखर उद्योग नियंत्रणाखाली असावा आणि त्याचे फायदे आपल्याला पिढ्यान्‌पिढ्या मिळावेत, असंच धोरण राज्यकर्त्यांनी ठेवलेलं होतं. साखरच नाही, सहकाराच्या नावाखाली ग्रामीण भागाचं पद्धतशीर शोषण केल्या गेलं. या सहकाराच्या शोषणाचं मोठं विदारक चित्र २५ वर्षांपूर्वी सहकाराची शोकांतिका ही मालिका लिहून शरद जोशींनी केलं होतं. तेव्हाच्या साप्ताहीक 'ग्यानबा'मध्ये ही मालिका प्रसिद्ध झाली. तेव्हा उभ्या महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली होती. सहकाराचे सगळे कैवारी असं म्हणायचे, की ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल, तर सहकाराशिवाय पर्याय नाही. यातही परत प्रामुख्याने सहकारी साखर कारखानदारच होते. या सगळ्यांनी मिळून आपली जबरदस्त पकड सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागावर बसवली. वर्षानुवर्षे सहकारातून पैसा शोषून घेतला. त्यातून सहकार महर्षी उदयाला आले; पण कारखाने मात्र हळूहळू डबघाईला येत गेले. सहकारी बँका बुडाल्या. सहकारी पतपेढ्या बुडाल्या. सहकारी दूध उत्पादक संघ बुडाले. यांचं फार मोठं दुःख कुणी केलं नाही आणि करतही नाही. सहकारी बँका बुडाल्यावर मात्र राष्ट्रवादीवाले थोडीफार तडफड करत आहेत; पण खरा गळ्याला फास बसला, तो सहकारी साखर कारखाने बुडायला लागल्यापासून. कारण याच कारखान्यांच्या आधारावरती त्या त्या भागातलं राजकारण या नेत्यांनी वर्षानुवर्षे आणि पिढ्यानुपिढ्या पुढे रेटलं होतं. बदलत्या काळात वाऱ्याप्रमाणे पाठ फिरवण्याच्या वृत्तीला अनुसरून बरेच सहकार महर्षी बघता बघता खासगी महर्षी झाले. म्हणजेच त्यांनी आपले कारखाने खासगी माध्यमातून उभारायला सुरुवात केली. मोठी गमतीची गोष्ट आहे, साखर उद्योग खुला व्हायला सुरुवात झाल्यानंतर मोठमोठ्या कंपन्या त्यामध्ये उतरणं अपेक्षित होतं; पण महाराष्ट्रात मात्र घडलं विचित्रच. खासगी कारखानेही परत राजकारण्यांनीच काढले. ज्यांनी सहकार बुडवला, त्यांनाच पुन्हा त्यांच्याच कर्तृत्वाची बक्षिसी म्हणून खासगी कारखान्याचा परवाना मिळाला. आता हा कारखाना चालवायचा तर जुन्या पद्धतीने चालवता येत नाही, हे यांना चांगल्या तऱ्हेने माहीत आहे. मग काय करायचं? तेव्हा यांनी मागणी केली की, सगळा साखर उद्योग नियंत्रणमुक्त केला पाहिजे. ज्या ज्या वेळेस सर्वसामान्य शेतकऱ्यांनी आंदोलनं केली, त्या त्या वेळेस राज्यकर्त्यांनी क्रूरपणे ही आंदोलनं मोडून काढली. सर्वसामान्य शेतकऱ्यांना कुठलाही लाभ मिळू दिला नाही. आता अशी परिस्थिती आहे, नियंत्रणं तर सोडाच; पण आहे त्या परिस्थितीत कारखाना चालवता येत नाही. हे लक्षात आल्यावर हेच सगळे महाभाग केंद्र शासनाच्या समितीसमोर साखर उद्योग नियंत्रणमुक्त करा म्हणून मागणी रेटतात.



काँग्रेस शासनाने असं नेहमीच केलं आहे. स्वतःच्याच मूळ भूमिकांपासून पूर्णपणे विसंगत भूमिका किंवा उलट भूमिका स्वीकारायची आणि ती आमचीच म्हणून सांगायची. बँकांचं राष्ट्रीयीकरण ही काही इंदिरा गांधींच्या डोक्यातली कल्पना नव्हती. तेव्हाच्या काँग्रेसमधील सिंडीकेट समजल्या जाणाऱ्या प्रस्थापित बड्या नेत्यांना शह देण्यासाठी त्यांचीच असलेली संकल्पना रात्रीतून इंदिरा गांधींनी उचलली आणि स्वतःच्या नावावर खपवली. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा इतका गाजावाजा इंदिरा गांधींनी केला की, कित्येक वर्षे सगळे असं समजून चालत होते ही कल्पना इंदिरा गांधींचीच आहे. यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने त्यांच्या संबंधाने बराच मजकूर सत्य स्वरुपात समोर येतो आहे. गोविंद तळवळकरसारख्या ज्येष्ठ पत्रकाराने याबाबत लिहून ठेवलं आहे, त्यातून हेच स्पष्ट झालं, ही कल्पना इंदिरा गांधींची नव्हती.

१९९१ साली मुक्त व्यवस्था स्वीकारण्या संदर्भात जो दबाव शासनावरती आला. त्यामध्ये शेतकरी चळवळीने फार महत्त्वाची आणि मोलाची भूमिका निभावली होती; पण तेव्हा विकासाचं आणि नव्या बदलांचं श्रेय पी. व्ही. नरसिंहराव आणि तत्कालिन वित्तमंत्री मनमोहन सिंग यांना दिल्या गेलं. मनमोहन सिंगांच्या बाबतीत तर अल्लाउद्दीनला जादूचा दिवा सापडावा असं काहीसं म्हटल्या जायचं. या जादूच्या दिव्यानं सगळं काही चांगलं होणार आहे, असं चित्र रंगवलं गेलं होतं. त्याची सुरुवातही चांगली झाली होती; पण बघता बघता काँग्रेस आपल्या मूळ पदावरती आली. हेच मनमोहन सिंग सोनिया गांधींच्या हातातलं कळसूत्री बाहुलं बनून पंतप्रधान झाले, त्यांनी स्वतःच सुरू केलेल्या बदलांना पूर्णपणे पाठमोरं वळवलं. हे सगळं काँग्रेसच्या नीतीप्रमाणेच झालं. साखर उद्योगाच्या बाबतीतही आपण सुरू केलेली धोरणं पूर्णपणे फिरवायची गरज आता काँग्रेसजनांना वाटू लागलेली आहे. त्यात कसलंही नवल नाही. कदाचित उद्या हेच सगळे मोठ्या आवाजात सांगत राहतील की आम्हीच कशी साखर उद्योग मुक्त करण्यासाठी धोरणं आखली होती.

जागतिक परिस्थिती बदलत आहे. आता कुणालाच बंदिस्त व्यवस्था ठेवणं कदापीही शक्य नाही. बदलत्या परिणामांना सामोरं जाण्यासाठी नवीन भूमिका मोकळेपणाने स्वीकाराव्या लागतील. जुन्या भूमिका स्वीकारून बसलो, तर त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. कितीतरी क्षेत्रांमध्ये बदलाचे वारे मुक्तपणे वाहू देणं भाग आहे. शेतीक्षेत्राला नवीन व्यवस्थेचा वारा लागला नाही. ते सातत्याने शेतकरी संघटनेने मांडले आहे. साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याची सगळ्यात पहिली मागणी ही फक्त शेतकरी संघटनेनेच केली होती. त्या काळात बंधनं काढून टाकण्याचं कुणाच्या मनातही नव्हतं. उलट जास्तीत जास्त पद्धतीने शासनावर अवलंबून राहण्यातच भलं आहे, असं सगळे मानत होते. आज साखरेचा प्रत्येक दाणा सरकारातल्या सगळ्यांनाच कडू लागतो आहे. त्याला एकमेव कारण म्हणजे राज्यकर्त्यांचं नालायक धोरण हेच राज्यकर्ते सी. रंगराजन समितीसमोर नियंत्रण हटविण्याची गळ घालत आहेत, हे मोठं गंमतशीर दृष्य आहे. यातला अजून एक धोका यांनी लक्षात घेतला नाही. ज्या दिवशी खरोखरच साखर उद्योग पूर्णतः नियंत्रणमुक्त होईल, त्या दिवशी यांची खासगी कारखानदारी टिकेल का? सहकार महर्षी म्हणून बिरूदं मिरवणं सोपं असतं; पण खासगी क्षेत्रात कुणाला महर्षी म्हणण्याची प्रथा नाही. तिथे आपला दर्जा कष्टाने, मेहनतीने आणि चातुर्यानेच सिद्ध करावा लागतो. स्पर्धेच्या युगात आपले प्रश्न स्पर्धेनेच सोडवता येतात आणि निरोगी स्पर्धेला तोंड देणं हे आमच्या राजकारण्यांना अगदी राजकारणातही कधी जमलेलं नाही, मग प्रश्न उरतो या राजकारण्यांना खासगी कारखान्यांच्या रूपाने हे आव्हान पेलेल का?

# बुडणाऱ्या जहाजावरील उंदरांची पळापळ

शेतकरी संघटनेचा ऊस दराचा लढा हा केवळ टनाला किती भाव मिळावा असा कधीच नव्हता. सरकारी अनुदानाच्या कुबड्या घेऊन चालणारी सहकारी साखर कारखानदारी आज ना उद्या कोसळणारच आहे. ती जेवढी लवकर कोसळेल तेवढे शेतकऱ्यांचे लवकर भले होईल, असे संघटनेवर जेव्हा फक्त नगदी पिकांचाच लढा शेतकरी संघटना लढते, कोरडवाहू, जिरायत शेतकरी - ज्वारी, बाजरी, हुलगे पिकवणारे शेतकरी यांच्याशी शेतकरी संघटनेला काही देणे-घेणे नाही, अशी टीका झाली तेव्हापासून साखर नियंत्रणमुक्त करण्याची निव्वळ भूमिका संघटनेने घेतलेली नसून झोनबंदी उठवणे, निर्यातबंदी उठवणे, उसाला एफआरपी देणे यासाठी लढे लढले. आज ज्यांना आपण केवळ एखाद्या समितीसमोर उत्तम सादरीकरण करून साखर नियंत्रणमुक्त होईल आणि मग आपण या निर्णयाचे श्रेय घेऊ असे वाटते त्यांनी शेतकऱ्यांच्या तीस वर्षांच्या लढ्याचा विसर पडू देऊ नये आणि त्यांच्या बरोबर कृतघ्नही होऊ नये, एवढे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.



ज्ञानेश्वर शेलार

साखर नियंत्रणमुक्तीसाठी केंद्रसरकारने नियुक्ती केलेली रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. सी. रंगराजन यांची समिती दि. १४ मे रोजी मुंबईत येऊन गेली. राज्यातील साखर कारखानदारांनी साखर नियंत्रणमुक्तीसाठी मुख्यमंत्री, सहकार मंत्र्यांच्या उपस्थितीत समिती समोर जोरदार प्रदर्शन करण्यासाठी लॉबींग केले होते. एकेकाळी सहकाराची गोड फळे चाखणारी ही मंडळी सरकारला निमूटपणे लेव्हीची साखर घालणे ऊस खरेदीपासून तर साखर विक्रीपर्यंतची सर्व नियंत्रणे साखर कारखानदारीवर राहावीत यासाठी प्रयत्नशील होती. आज त्यांनाच हे नियंत्रणाचे जोखड नकोशे झाले आहे. देशातील ३० टक्क्यांहून अधिक साखर एकट्या महाराष्ट्रात तयार होते. देशातील सर्वाधिक साखर कारखाने २१२- महाराष्ट्रात आहेत. राज्यात साखर उद्योगात पन्नास हजार कोटींची गुंतवणूक झालेली आहे. अशा पार्श्वभूमीवर साखर नियंत्रणमुक्तीच्या निर्णयात महाराष्ट्राची भूमिका निर्णायक मानली जाते. यासाठीच डॉ. रंगराजन समितीपुढे करावयाच्या सादरीकरणाची जोरदार तयारी (लॉबींग) साखर कारखानदारांनी व मंत्र्यांनी केली होती. साखर कारखानदारी तिच्या राजकारणातील प्रभावामुळे व अर्थकारणातील घोटाळ्यामुळे शुगर लॉबी या नावाने अगोदरच बदनाम झालेली आहे. सरकारी मदतीवर साखर कारखानदारी चालवायची होती व राजकारण करायचे होते, त्यावेळीही हीच लॉबी महाराष्ट्रात सर्वांत प्रभावी होती. आता बाजू पलटली असून या लॉबीने खासगीकरणाकडे वाटचाल सुरू केली आहे. सरकारी बंधने तिला नको आहेत. शेतकरी संघटनेचा शेतीमालाच्या भावाचा लढा जेव्हा सुरू झाला, तेव्हा तो कांदा, ऊस, कापूस अशा नगदी पिकांपासून झाला. या लॉबीने काही काळ शेतकरी संघटनेला समर्थनही दिलेले आहे. एकोणावीसशे चौऱ्याऐंशी साली महाराष्ट्रभर शेतकऱ्यांची हजारो वाहनांची दिंडी काढण्यात आली होती, त्यामध्ये जवळजवळ सर्वच साखर कारखानदार आणि सहकार महर्षी हजर होते. महाराष्ट्रात चाललेली सहकार चळवळ आणि तिच्या अनुषंगाने सरकारी पैशांची सहकाराच्या नावाखाली काही मोजक्या लोकांनी गिळंकृत करण्याची पद्धत हीच महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांसाठी शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्यात आडकाठी ठरत आहे, अशी भूमिका संघटनेने घेतल्यानंतर मात्र ही शुगर लॉबी ताबडतोब शेतकरी संघटनेपासून अलग झाली. आपल्या मूळच्या पक्षात आणि पुढाऱ्यांच्या पंखाखाली पुन्हा एकदा जमा झाली. आज मात्र साखर कारखानदारी निव्वळ राज्यापुरती किंवा देशापुरती मर्यादीत राहिली नसून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा क्षणोक्षणी तिच्यावर प्रभाव पडत असल्याने कधी आयातबंदी, तर कधी निर्यातबंदी, कधी कोटा, तर कधी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक आमीष अशा अनेक खटपटी लटपटी आता त्यांना डोईजड झाल्या आहेत. या सहकार महर्षींच्या मुखंडांनी मात्र उसाला भाव दिला तर आणि साखर नियंत्रणमुक्त केली तर सहकार चळवळ बुडेल, ऊस उत्पादक शेतकरी मरेन, अशी अनेक वेळा कोल्हेकुई केली. आजही ते नियंत्रणमुक्तीबाबत स्वतः कुठलीही भूमिका घेत नाहीत, मात्र आपल्या तालुक्या तालुक्यात साखर कारखाने काढून बसलेल्या पिलावळीने जोपर्यंत मागणी केलेली नाही. तोपर्यंत त्यात बदल करायचा नाही आणि बदल केल्यानंतर आम्ही हा शेतकऱ्यांच्या हिताचा आणि लोकभिमूख बदल केलेला आहे, सहकारी साखर कारखानदारी आणि सहकार यात राजकारण नको यासाठी आम्ही हा बदल केलेला आहे, अशी मखलाशी केली जाते. अर्थात साखर कारखानदारीच्या जीवावर ४० - ४० वर्षे राजकारण खेळून झाल्यावर हे शहाणपण सुचले आहे.

शेतकरी संघटनेचा ऊस दराचा लढा हा केवळ टनाला किती भाव मिळावा असा कधीच नव्हता. सरकारी अनुदानाच्या कुबड्या घेऊन चालणारी सहकारी साखर कारखानदारी आज ना उद्या कोसळणारच आहे. ती जेवढी लवकर कोसळेल तेवढे शेतकऱ्यांचे लवकर भले होईल, असे संघटनेवर जेव्हा फक्त नगदी पिकांचाच लढा शेतकरी संघटना लढते, कोरडवाहू, जिरायत शेतकरी - ज्वारी, बाजरी, हुलगे पिकवणारे शेतकरी यांच्याशी शेतकरी संघटनेला काही देणे-घेणे नाही, अशी टीका झाली तेव्हापासून साखर नियंत्रणमुक्त करण्याची निव्वळ भूमिका संघटनेने घेतलेली नसून झोनबंदी उठवणे, निर्यातबंदी उठवणे, उसाला एफआरपी देणे यासाठी लढे लढले. आज ज्यांना आपण केवळ एखाद्या समितीसमोर उत्तम सादरीकरण करून साखर नियंत्रणमुक्त होईल आणि मग आपण या निर्णयाचे श्रेय घेऊ असे वाटते त्यांनी शेतकऱ्यांच्या तीस वर्षांच्या लढ्याचा विसर पडू देऊ नये आणि त्यांच्या बरोबर कृतघ्नही होऊ नये, एवढे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

साखरेवर ३५% लेव्हीची जबरदस्ती असताना संघटनेने लेव्ही साखरेचे ट्रक अडवून संपूर्णपणे लेव्ही उठवावी, एवढेच नव्हे तर अन्नधान्य, फळे, भाज्या, ऊस इत्यादींवरील जीवनावश्यक वस्तूंचा कायदा काढून टाकावा, अशी मागणी केलेली आहे. साखर नियंत्रणमुक्त करण्यासाठी १० टक्के लेव्ही साखर घेऊ नये, साखर विक्रीवरील सरकारी नियंत्रण पूर्णतः हटवावे, कारखान्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे साखर विक्री करू द्यावी, निर्यातीचे धोरण किमान १० वर्षांसाठी कायम ठेवावे असा आग्रह रंगराजन समितीसमोर धरला होता. हाच आग्रह

३० वर्षांपासून शेतकरी संघटनेने धरला आहे. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे, एवढेच नव्हे तर सहकार महर्षींच्या पाठीत उसाची काठी घालण्याचे एफआरपी न देणाऱ्या सहकार महर्षींच्या घराला घेराओ घालणे, रास्ता रोको, भाव जाहीर करीत नाहीत तोपर्यंत उसाच्या गाड्या व ट्रक अडवणे, सहकारी महर्षी आपल्या कर्जफेडीसाठी गुपचूप गोदामातून साखर विक्रीसाठी नेत असताना साखरेचे ट्रक अडवणे, अशा प्रकारची आंदोलने अगदी गेल्या हंगामापर्यंत केली आहेत, याचे भान ठेवून त्या वेळी शेतकऱ्यांवर गोळीबार कोणी केला, त्यांना तुरुंगात कोणी डांबले? त्यांच्यावर २०-२५ वर्षांपासून आंदोलनाच्या केसेस कशा चालू आहेत? आणि हे करणारे पक्ष आणि सहकार महर्षी कोण होते? याची आठवणही ठेवावी.

ही मागणी करतानाच शेतकऱ्यांचा 'बफर'सारखा व त्यांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्नही लॉबींग करणाऱ्यांनी केला आहे. साखर नियंत्रणमुक्त करावी मात्र हंगाम सुरू होण्याअगोदर उसाची किफायतशीर किंमत (एफआरपी) जाहीर करण्याची पद्धत केंद्र सरकारने पूर्वीप्रमाणेच कायम ठेवावी, अशी भूमिकाही कारखानदारांनी घेतलेली आहे. शेतकऱ्यांना मात्र सरकारच्या दावणीला बांधून आपल्या गळ्यातील दावे मोकळे करण्याचा हा सहकार महर्षींचा प्रयत्न आहे. गेल्या हंगामातील शेतकरी संघटनेच्या एफआरपीसाठीच्या आंदोलनानंतर जाहीर केलेला १८५० चा भाव ही अजून काही साखर कारखान्यांनी दिलेला नाही. त्या विषयी त्याचे आंदोलनही छेडण्याच्या तयारीत सध्या ऊस उत्पादक आहेत. अशा पद्धतीत भाव मात्र सरकारने जाहीर करावेत आणि नंतर सहकार महर्षींनी आम्हाला हे भाव देणे परवडत नाहीत म्हणून पुन्हा आपला हात सरकारपुढे पसरवून नियंत्रणमुक्त झाल्यावरही सरकारी खजिन्याची लूट करण्याची तजवीज मात्र करून ठेवण्याचा त्यांचा इरादा स्पष्ट दिसतो आहे.

पेट्रोल व डिझेलचे भाव आवाक्याबाहेर जात असताना किमान पाच टक्के तरी इथेनॉल मिसळण्याची परवानगी द्यावी अशी मागणी गेल्या १० वर्षांपासून शेतकरी संघटना करीत आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांवर ढिम्म आहे. कारण सहकार महर्षींनाच इथेनॉल कमी भावाने विकून त्याचा उपयोग मद्यार्क निर्मितीसाठी करायचा होता तोपर्यंत इथेनॉलच्या परवानगीविषयी ते शब्दही काढायला तयार नव्हते. आता हेच लोक इथेनॉल मिश्रण अनिवार्य करावे अशी मागणी घेऊन रंगराजन समितीपुढे हजर झाले. गेल्या २०-२५ वर्षांत साखर नियंत्रणमुक्त झाल्यामुळे संपूर्ण कारखानदारी विकलांग झाली आहे. हाच निर्णय २०-२५ वर्षे अगोदर सोडाच किमान १० वर्षे अगोदर जरी झाला असता आणि शेतकरी संघटनेच्या मागण्यांना सरकारने प्रतिसाद दिला असता तर ही वेळ आली नसती. आज सहकारी कारखानदारीचे जहाज बुडते आहे आणि उंदरांची या बुडणाऱ्या जहाजावर पळापळ सुरू झालेली आहे.

■■

# पश्चिम घाट अहवालाचा अजब गोंधळ

## प्रा. माधव गाडगीळांनी डोंगर पोखरून काढला उंदीर

प्रा. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्रालयाने पश्चिम घाटातील जैव विविधता, पर्यावरण संरक्षण इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीने नुकताच आपला अहवाल केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्रालयाला सादर केला आहे. अहवालाची सुरुवात कधीकाळी जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनी पश्चिम घाटातल्या अफाट वनसंपदेचे वर्णन 'असंख्य वनस्पती आणि जिवांचा महासागर' असे करून ठेवल्याचे नमूद केले आहे. कालिदासाने पश्चिम घाटाला एका सौंदर्यवतीची उपमा आपल्या काव्यात दिलेली आहे, असेही सांगितले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे विशेषतः पश्चिम घाटाला महाराष्ट्रात सह्याद्री म्हणतात. या सह्याद्रीच्या कडेकपारीतून वसले आणि विकसित झाले. स्वराज्याचा नकाशा म्हणजे सह्याद्रीच्या रांगा. शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याने यवनांशी केलेला संघर्ष आणि त्यामुळेच अफजल खानाने त्यांना चुहा अशी उपमा दिली आणि त्या चुह्याला मी केव्हाही पकडून आणीन असे मूठ वळवून दरबारात सांगितले. पश्चिम घाटाचे हे सर्व वर्णन केवळ त्याचे जैव वैविध्याने नटलेले कविंना काव्याची स्फूर्ती देणारे आणि छत्रपतींना स्वराज्य स्थापनेसाठी आपल्या अंगाखांद्यावर खेळवणारे हे सर्वांना माहीत आहे. याच पश्चिम घाटाचा गेल्या १०० वर्षांत विविध कारणांसाठी कसा विध्वंस झाला आहे, हे या अहवालात सविस्तर सांगितले आहे. त्यावरील उपाययोजनाही सांगितल्या आहेत. नीलगिरी पर्वतावरील काही ठिकाणे वगळता पश्चिम घाटावरील जैव वैविध्याचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला आहे. एकोणिसाव्या शतकात भारताने आधुनिकतेची कास धरली. धरणे, विद्युत निर्मिती केंद्रे, रस्ते, महामार्ग, लोहमार्ग, उद्योग आदींची उभारणी या काळात वेगाने झाली. हे करीत असताना तात्कालिक लाभाकडे लक्ष दिल्याने त्याचे दुष्परिणाम आता समोर येऊ लागले आहेत. या दुष्परिणामांचा आणि होणाऱ्या ऱ्हासाचा अभ्यास करून उपाययोजना करण्यासाठीच प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ प्रा. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपल्या अहवालामध्ये अभ्यासपूर्ण नोंदी करून पश्चिम घाटाचे विविध भाग त्यातील कोणत्या भागात कशाप्रकारे ऱ्हास झाला आहे, संवेदनशील प्रदेश कोणता आहे, अजूनही काही भागांचा फारसा ऱ्हास झालेला नाही, अशा गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. महाराष्ट्रातील खान्देश, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील १० जिल्ह्यांमध्ये पश्चिम घाट पसरला आहे, यापैकी महाराष्ट्रात सह्याद्रीच्या रांगा आणि कोकण यांना आपण निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रदेश म्हणतो. त्यातीलच काही रांगा खान्देश, मध्य महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातही पसरलेल्या आहेत. यावर ताबडतोब उपाययोजना केली नाही, तर राहिलेली जैवविविधताही काही वर्षांत नष्ट होईल आणि तिची धूळधाण उडेल अशी भीती अहवालात सांगितली आहे.

यातील काही भाग हा तीव्र संवेदनाशील परिसर म्हणून समितीने नोंदवला आहे. नाशिक, पेठ, दिंडोरी (नाशिक), मुरबाड, मोखाडा, जव्हार (ठाणे), घोड, पौड, भोर, वडगाव (पुणे), मेढा, पाटण, वाई, महाबळेश्वर (सातारा), राधानगरी, गारगोटी, शाहूवाडी, पन्हाळा, बावडा (कोल्हापूर), म्हसाळा, पाली, पोलादपूर, रोहा, पेण, महाड (रायगड), देवरूख, चिपळूण (रत्नागिरी), कोकणवाडी, सावंतवाडी (सिंधुदुर्ग) वरील तालुके हे संवदेनाशील म्हणून नमूद करण्यात आले आहेत. त्यातीलच सुरगाणा (नाशिक), पारनेर (नगर), कोरेगाव (सातारा), मंडणगड (रत्नागिरी) हा प्रदेश संवेदनशील परिक्षेत्र म्हणून

नमूद करण्यात आला आहे.

गेल्या १० वर्षांत कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक घडामोडींना वेग आला आहे. यातील ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी दाभोळ प्रकल्प जो पर्यावरणाच्या कारणासाठीच सुलभा ब्रह्मे व मेधा पाटकर यांनी पर्यावरण संरक्षण आणि तेथील लोकांच्या जमिनी घेण्याला विरोध करून बंद पाडला. त्यानंतर रिलायन्स आणि इतर मोठ्या कंपन्यांनी खाणकाम, उद्योगांच्या वाढीसाठी 'सेझ' उभारणी इत्यादींसाठी मोठ्या प्रमाणात रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत जमिनी खरेदी केल्या. त्यालाही पर्यावरणावाद्यांनी पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या जमिनी अल्पदराने घेतल्याच्या कारणासाठी विरोध करून 'सेझ' होऊ दिले नाही. हा वेग काही काळासाठी मंदावल्याचे जाणवत असले तरी पुन्हा येथे मोठ्या प्रमाणावर 'सेझ' नसतानाही छोट्या छोट्या तुकड्यांनी उद्योग उभारणी सुरू आहे. एका बाजूला देशाने अंगिकारलेले विकासाचे धोरण त्याला पर्यावरणवाद्यांचा विरोध आणि त्यासाठी पर्यावरणवाद्यांनी घेतलेली आडमूठी भूमिका असे त्रांगडे निर्माण झाले आहे.

प्रा. माधव गाडगीळ हेही देशपातळीवरील एक मान्यताप्राप्त पर्यावरणवादी आहेत. त्यांचा वेगवेगळ्या पर्यावरण विषयक कामांमध्ये व विविध समित्यांवर काम करण्याचा गाढा अनुभव आहे. असे असुनही सर्व पर्यावरणवादी व डाव्या विचारसरणीची मंडळी ज्या पद्धतीने पर्यावरण व इतर आर्थिक सुधारणा, सेझ यांसाठी या सेक्युलर (निधर्मी) लोकांचा विरोध करण्याचा एक धर्मच तयार झाला आहे. ५०-६० वर्षांपूर्वी डाव्या विचारसरणीने भारतीय राजकारणावर पाडलेला प्रभाव त्यातून देशाने स्वीकारलेली अर्थकारणाची समाजवादी व्यवस्था, त्यावेळी मांडलेले विचार आणि त्याचाच पर्यावरणवाद्यांनी आता धर्म म्हणून केलेला स्वीकार यांत काडीचाही बदल करण्यास ते आता तयार नाहीत. पर्यावरण विषयक अभ्यास करण्यासाठी अशा लोकांची जेव्हा विविध समित्यांवर अहवाल तयार करण्यासाठी नियुक्ती केली जाते. त्यावेळी त्यांच्या अहवालातून येणारे निष्कर्ष हे जवळजवळ अगोदरच ठरवून ठेवलेले आहेत की काय अशा प्रकारचे येतात. आर्थिक सुधारणांना देशात येणाऱ्या नवीन तंत्रज्ञानाला खुल्या व्यवस्थेला जागतिकीकरणाला, उदारीकरणाला विरोध करण्यासाठी जी जी म्हणून काही वैचारिक मांडणी करता येईल, ती सर्व अगोदरच करून ठरलेल्या निष्कर्षाप्रत या अहवालांना घेऊन जाणे अशा प्रकारची रचना प्राध्यापक माधव गाडगीळ यांच्या अहवालाचीही झालेली दिसते. पश्चिम घाटामध्ये जागतिक पातळीवर मान्यता पावलेली आणि कोठेही जगात इतर ठिकाणी नसलेली भारतात एकमेव असलेली अशी जैवविविधता आहे, हे खरे आहे. ती टिकून ठेवण्यासाठी सांगितलेले उपायमात्र आजच्या काळात व्यवहार्य ठरणार नाहीत, असे आहेत. संपूर्ण पश्चिम घाटात कोठलाही उद्योग येऊ द्यायचा नाही. खाणकाम करायचे नाही. वीजनिर्मिती केंद्रे उभारायची नाहीत. शेती करायची नाही. लाकूडतोड करायची नाही. जनावरांना प्रतिबंध घालायचा, पवनचक्क्या बसवायच्या नाहीत. अशा प्रकारच्या उपाययोजना अहवालात सांगितलेल्या आहेत. आज तरी अशी भूमिका घेणे शक्य नाही. पश्चिम घाट जर खनिज संपत्तीने समृद्ध असेल, तर गोवा, कर्नाटक, इत्यादी राज्यांनी ज्या पद्धतीने खाणकामाला परवानगी दिलेली आहे, तशी परवानगी महाराष्ट्रातसुद्धा द्यावी लागेल. कर्नाटकचे मुख्यमंत्री येदीयुरप्पा यांनी खाण घोटाळा करून संपूर्ण खाणकामाच्या विकासासाठी आखलेले धोरणच बदनाम करून टाकले आहे. त्याला अटकाव कसा करता येईल आणि खाणकाम करूनसुद्धा पर्यावरण संरक्षण कसे करता येईल, अशा उपाययोजना अहवालात नाहीत. एका बाजूला किनारपट्टीला अणू ऊर्जा केंद्रे उभारायला प्रतिबंध करायचा आणि लाकूडतोडही करू द्यायची नाही. कोळसा आणि लोखंडासाठी खाणकामही करायचे नाही, अशी भूमिका घेऊन केवळ पर्यावरण संरक्षण यासाठी आपण आपल्या देशाला आणखीन ५०-६० वर्षे मागे नेऊ शकत नाहीत. पवनचक्क्यांसारख्या कुठलेही प्रदुषण न करणाऱ्या ऊर्जा स्रोतालाही पर्यावरणवाद्यांनी मोठा विरोध करून शेतकऱ्यांना बरोबर घेऊन त्या बंद पाडल्या आहेत. या देशात पर्यावरणाच्या नावाखाली १०० वर्षांपूर्वीचे आदिवासींचे जीवन संपूर्ण पश्चिम घाटात प्रस्थापित करण्याचा घाट पर्यावरणवाद्यांनी घातला आहे.

यावर कडी म्हणजे पश्चिम घाटामध्ये कुठल्याही प्रकारचे जीएम (जेनेटिकली मॉडीफाईड) बियाणे आणि पिके लावू नयेत, संपूर्ण क्षेत्रामध्ये रासायनिक खतांचा वापर करू नये. रसायनांचा फवारणीसाठी वापर करू नये. असे प्रतिबंध घालावेत अशी सूचना अहवालात करण्यात आलेली आहे. मूळातच कोकणाचे उदाहरण घेतले तरी या भागात आंबा, काजू, भात, नारळ, सुपारी अशी पिके घेतली जातात. भातामध्ये अद्यापतरी कपाशीसारखा बीटीचा वापर करण्यात आलेला नाही. जीएम बियाणे वापरण्यात आलेले नाही. आंबा आणि काजू यांमध्येही वरीलप्रमाणे कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. नारळ आणि सुपारीच्या बागा तर अगदी जुन्याच पद्धतीने लावून कुठल्याही फवारण्या व रासायनिक खते न वापरता वाढवून उत्पादन घेतले जात आहे. जैव विविधतेला निर्माण झालेला सर्वांत मोठा धोका हा रासायनिक खते आणि जीएम बियाणे यांच्यापासून झाला आहे, असे अहवालात म्हटले आहे. मूळातच संपूर्ण पश्चिम घाटात अशा प्रकारचा वापर कोठेही करण्यात आलेला नाही. हायब्रीड बियाण्यांचा वापरसुद्धा होत नाही. फक्त भातामध्ये हायब्रीडचे वाण आहे. तेही देशातील वाणांशी संकर करूनच करण्यात आले आहे. मूळाचत जगप्रसिद्ध बासमती तांदूळ हा भारत आणि पाकिस्तान या दोनच देशांत पिकतो. त्यांचा संकर इतर वाणांशी करण्याचे प्रयत्न होऊ शकतात. बासमतीमध्ये मात्र अद्यापतरी कुठलाही दुसरा वाण मिक्स केलेला नाही, असे असताना अहवालामध्ये शेतीत येणाऱ्या नेमक्या जैव तंत्रज्ञानाला कडाडून विरोध केला आहे. या विरोधामुळे संपूर्ण शेतकऱ्यांमध्ये जीएम बियाणे म्हणजे आपल्या शेतीवरील गंडांतर आहे, अशी भावना निर्माण होऊ शकते. मूळातच भारतात आता कुठे बीटी कॉटन आले आहे. वांग्याला तीव्र विरोध चालू आहे, त्यातच पुन्हा जीएम बियाणे किती घातक आहे, असे पर्यावरणवादी पदोपदी सांगत सुटले आहेत. सह्याद्री घाट वाचवण्यासाठी जैविक तंत्रज्ञान कसे वापरता येईल, नामशेष होणाऱ्या सजिवांच्या जाती, प्रजाती जैव तंत्रज्ञान वापरून कशा वाचवता येतील, याचा अहवालात कोठेही उल्लेख नाही. पारंपरिक ज्ञानावर आधारित निघालेली ही प्राध्यापक माधव गाडगीळांची टीम सह्याद्री घाटाला नवीन जैविक तंत्रज्ञानाचा आधार न घेता पश्चिम घाटाला कशी वाचवेल?

प्रा. माधव गाडगीळ यांनी अहवालात पुन्हा एकदा जैविक शेती संपूर्ण पश्चिम घाटात करावी, रासायनिक शेतीला कडक निर्बंध असावेत असे सुचविले आहे. सरकारने स्वतःही आपल्या सर्व कृषी विभागांमार्फत गेल्या १० वर्षांपासून जैविक शेती कशी उपयुक्त आहे, यासाठी आपली संपूर्ण यंत्रणा कामाला लावली आहे. मोठा खर्च करण्यात येत आहे. नवीन संशोधन करण्यासाठी विद्यापीठे, कृषीविद्यालये यांना मदत करण्याऐवजी गावोगावी सरकारी योजनांच्या माध्यमातून सरकार स्वतःच जैवीक शेतीची जाहिरात करीत आहे. हाच पैसा नवीन संशोधन करण्यासाठी किमान बाहेरच्या देशांनी केलेले संशोधन तात्काळ आपल्या देशात आणणे व प्रसार करणे यासाठी वापरण्यात येत नाही. प्राध्यापक माधव गाडगीळ यांनीही जीएम बियाण्यांना विरोध करणे आणि रासायनिक शेतीला विरोध करून जैविक शेती करावी असा निष्कर्ष काढणे यातच आपला संपूर्ण अहवाल खर्ची घातला आहे.

**ज्ञानेश्वर शेलार**

मो. ९२२६७९७०१८

■■

# परिस्थिती शेती आणीबाणीची!



विनय हर्डीकर

शेतकऱ्यांच्या दररोज होत असलेल्या आत्महत्या हा आता शहरी लोकांच्या लेखी दखलपात्र विषय राहिलेला नाही. त्यांच्यासाठी जाहीर होणाऱ्या कोटी कोटींच्या आर्थिक पॅकेजेसमुळे उलट ते असुयेचाच विषय बनले आहेत. परंतु मुळात शेतकऱ्यांवर ही पाळी का येते, याच्या खोलात कुणीही शिरू मागत नाही. आज शेती बिलकूल परवडेनाशी झाली आहे. नाइलाजास्तव, दुसरा पर्यायच उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना ती करावी लागते. या वास्तवाकडे ना सरकार लक्ष देत, ना लोक! आज त्यांना कुणीच वाली राहिलेला नाही. भविष्यात शेती टिकवायची असेल तर शेतकऱ्यांची अक्षम्य उपेक्षा, त्यांचं भयावह जिणं संपवायला हवं. याकरता शेती-आणीबाणीच लागू करायला हवी.

आपल्या देशासमोर सध्या आ वासून उभी असलेली भयानक संकटे कोणती, हा प्रश्न सुजाण भारतीयांना विचारला तर अनेक संकटांचा उल्लेख केला जाईल. पाकिस्तान केंद्रीय आंतरराष्ट्रीय दहशतवाद, देशाच्या आदीवासीबहूल प्रदेशातला वाढता नक्षलवाद, भ्रष्टाचार! जरा अधिक जाणकारी असलेल्यांकडून जागतिक आर्थिक मंदी, भारतीय अर्थव्यवस्थेचा स्थिर न राहणारा वाढीचा दर, राजकीय अस्थिरता व विघटनाच्या शक्यता यांचा उल्लेख केला जाईल. हळवे विचारवंत पर्यावरणाचा विनाश, भारतीय संस्कृतीचे बाजारीकरण यांचा तर फारच विचार करणारे 'एकूणच मानवी अस्तित्वाची अर्थशून्यता' या संकटाचाही उल्लेख करतील. मात्र, शेतकऱ्यांमधले वाढते वैफल्य हे सावकाशपणे चालून येत असलेले भयानक संकट आहे, याची जाणीव कोणालाच नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे या महाकाय संकटाच्या हिमनगाचे केवळ वरचे टोक आहे. या संकटावर वेळीच उपाययोजना केली नाही तर देशाची टायटॅनिक व्हायला वेळ लागणार नाही! सर्वच विचार करणारांनी, जबाबदार नागरिकांनी खडबडून जागे व्हावे अशी धोक्याची घंटा या आत्महत्यांमधून वाजते आहे.

एरवी अत्यंत संवेदनशील असणारे बिगर-शेतकरी नागरिक याच बाबतीत इतके उदासीन का असावेत? दहशतवादी हल्ले, नैसर्गिक आपत्ती, रेल्वे-रस्ता-विमान अपघात, शहरांमधून वाढत चाललेले ज्येष्ठ नागरिकांवरचे हल्ले, 'सत्यमेव जयते'मधून बेगडी पद्धतीने का होईना, अधोरेखित होणारे विदारक सामाजिक वास्तव या नागरिकांना मदतकार्यात सहभागी व्हायला, एकमेकांशी चर्चा करायला प्रवृत्त करते, मात्र शेतकऱ्यांच्या वैफल्याबद्दल त्यांच्यात इतकी मख्ख अनास्था का?

पहिले कारण स्पष्ट आहे. दहशतवाद्यांचे बॉम्बस्फोट, नैसर्गिक संकटे, अपघात, शहरी असुरक्षितता आपल्याही वाटय़ाला येऊ शकते, हे सर्वानाच कळते. कळत/नकळत, स्वच्छेने/अनिच्छेने भ्रष्टाचारामुळे सर्वांनीच हात टेकले आहेत. मात्र, प्राण गेला तरी (आणि शेतकऱ्यांच्या समस्या युद्धपातळीवर प्रयत्न करून सोडवल्या नाहीत तर प्राण कंठाशी येणारच आहेत!) आपल्याला शेती करावी लागणार नाही, हे बिगर-शेतकरीवर्गाला पक्के ठाऊक आहे. किंबहुना शेतीवर प्राथमिक गरजा भागवण्यासाठी आपण अवलंबून असलो, तरी त्या गरजा केवळ प्राथमिक असल्यामुळे स्वस्तातच भागल्या पाहिजेत; अन्नधान्य, भाजीपाला, दूध, फळफळावळ विपुल प्रमाणात आणि स्वस्त दरातच उपलब्ध असली पाहिजे, अशी पक्की खूणगाठ त्यांनी बांधली आहे. महाग कपडे, दागदागिने, घरे, घरातले फर्निचर, दोन-चार चाकी वाहने, काही विशिष्ट काळात मिळणारी आंब्यासारखी फळे ही प्रतिष्ठेची मानचिन्हे आहेत. भरपूर पैसे देऊन उत्तम (?) खाणेपिणे ही हॉटेल संस्कृती बोकाळत असली तरी 'प्राथमिक गरजा भागवणारी शेती-उत्पादने स्वस्ताच मिळाली पाहिजेत, हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' अशा थाटात हा वर्ग वावरतो आणि 'तो मी मिळवेनच' हा उत्तरार्ध पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना गुलाम ठेवणाऱ्या, लुटणाऱ्या, नाडणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या, नोकरशाहीच्या, शेतकऱ्यांच्या वैफल्याची खरी, वास्तव मीमांसा न करणाऱ्या तज्ज्ञांच्या (पी. साईनाथसारखा अपवाद!) आणि सनसनाटीकरणाची खोड लागल्यामुळे शेतीमधले वास्तव न मांडणाऱ्या माध्यमांच्या संगनमतात तो सामील होतो.

आजची परिस्थिती इतकी भयानक आहे की, शेतीमालाचा भाव, शेतकऱ्यांना वीज-पाणी-रस्ते उपलब्ध होणे, शेतीमालाचा बाजार सरकारी नियंत्रणापासून मुक्त ठेवणे, हे आपले विषय नाहीत. सरकार आणि शेतकरी काय ते बघून घेतील, आपण फक्त कांद्याचे भाव वाढले की 'आता गरीब काय खातील आणि कसे जगतील' अशी ओरड (आपल्या भल्यासाठी) केली म्हणजे झाले, ही सोयीची विचारसरणी सोडण्याची निंतात आवश्यकता आहे, भविष्याची ही हाक वेळीच ऐकायला हवी.

कोणताही व्यवसाय नीट चालला आहे की नाही, हे ठरविण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांच्या टोळ्या आणि आकडेवारी यांची गरज नसते; तो व्यवसाय करणारांच्या कुटुंबाची भेट घेऊन तीनच प्रश्न विचारावेत. आपल्या मुलाने याच व्यवसायात राहावे असे बापाला वाटते काय? बापाने हा व्यवसाय एका टप्प्यापर्यंत आणला; आता मी तो पुढे नेईन असे मुलगा म्हणतो काय? आणि त्या घरातली लग्नाच्या वयात आलेली मुलगी माझा नवरा हाच व्यवसाय करणारा हवा असे स्वप्न रंगवते काय? भारतातील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात हे प्रश्न विचारा आणि होकारार्थी उत्तरे आली तर भारतरत्न पदवीसाठी खुशाल अर्ज करा!

एक शरद जोशींचा अपवाद वगळता माझ्यासारख्या शहरी, आंग्लाळलेल्या



ब्राह्मणाला महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे जेवढे प्रेम लाभले तेवढे क्वचितच कुणाच्या वाट्याला आले असेल! मात्र त्या सर्वांची क्षमा मागून एक निरीक्षण नोंदवणे भाग आहे. पंचवीस वर्षांपूर्वी मी दौऱ्यावर असायचो तेव्हा त्यावर्षीची पीक-परिस्थिती, संभाव्य भाव, भाव कमी असेल तर कोणते आंदोलन आणि केव्हा करायचे त्याची रणनीती हे मुख्य मुद्दे शेतकऱ्यांच्या बोलण्यात येत असत. जवळपासच्या गावी राजकीय पुढारी, सरकारी अधिकारी, बँकांचे वसुलीसाठी येणारे गुमास्ते, वीज कनेक्शन तोडण्यासाठी आलेल्या कर्मचारी यांना कसे नमवले, पळवून लावले, अशा रोमहर्षक घटना कानावर पडत. नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांकडे लक्ष वेधले जाई. आणि रात्र संपली तरी घेऊ घामाचे दामसाठी काय करता येईल, याचीच चर्चा चालू असे. आताचे चित्र याच्या उलट आहे.

रस्त्यालगतची जमीन चांगला भाव आला म्हणून विकली. ते पैसे सेफ डिपॉझिटमध्ये ठेवून आता उतारवयात आम्ही नवरा-बायको पगारदार झालो आहोत. सरकारी प्रकल्पात (विमानतळ इ.) जमीन गेली. तिची नुकसान भरपाई मिळाली. ते पैसे व्याजी लावले. पगारदार जावई मिळून मुलगी शहरात स्थायिक झाली. एक मुलगा शिकून शहरात सेट्ल होतो आहे. जमीन विकून त्याच्यासाठी एक फ्लॅट घेतला की आम्ही पुण्यातच येऊ. काही खटपट करून मुलगा / भाचा / पुतण्या / नातू यांना पुण्यात नोकरी बघा, पण आता शेतीमधून आम्हाला बाहेर काढा.. याच यशोगाथा (सक्सेस स्टोरीज) किंवा अगतिक मागण्या असतात. सरकारी वा खासगी (विशेषतः शिक्षणसंस्था, बँका यांच्यामधली) नोकरी मिळवण्यासाठी तीन-चार वर्षांच्या पगाराची रक्कम लाच म्हणून दिली जाते. तीही शेती विकूनच! तरुण मुले आपल्याला विनय काकासारखे शहरी व्हायचे आहे अशा भावनेने माझ्याकडे बघत असतात. वडील शेतकरी होते, संघटनेचे कार्यकर्ते होते, तसाच मुलगाही दोन्ही भूमिकांमध्ये समाधानाने वावरताना दिसण्याची उदाहरणे जवळपास नाहीतच. भास्करराव बोरावके व हेमंत बोरावके (कोपरगाव) अशा जोड्या कमी होत आहेत.

ज्यांना शरद जोशींसारखा विचारांनी समृद्ध, आंदोलनाच्या रणनीतीमध्ये वाकबगार, अर्थशास्त्रामधला तज्ज्ञ नेता लाभला, २५ वर्षे ज्यांनी शेतीमालाच्या भावासाठी जिवाचे रान केले, ती मंडळी केवळ उतारवयाकडे झुकली म्हणून असे बोलत नाहीत; तर सर्व करून झाले, पण प्रश्न होता तिथेच राहिला, ही खंत कोणी बोलून दाखवतात, तर कोणी मनातच ठेवतात. आमच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये जर अशी उदास हतबलता आली असेल, तर ज्यांना कोणतेही संरक्षण नाही, त्या देशभर पसरलेल्या शेतकऱ्यांची मनःस्थिती कशी असेल?

शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनांत उतरत होते, रस्ते व रेल्वे अडवून आपल्या मागण्या रेटत होते, संघटित ताकद दाखवून देत होते, देशाच्या / राज्यांच्या राजधानीत ठिय्या मारून बसत होते, तेव्हा वैतागाने का होईना, बिगर-शेतकरीवर्गाचे त्यांच्याकडे लक्ष तरी जात होते. आता तसे काही होत नाही. कारण शेतीउत्पादन करून देशाला भुकेच्या राक्षसिणीच्या तावडीतून मुक्त करणारे सैन्यच गुपचूप पळ काढते आहे. शेतीमध्ये कणाचा मण होतो हे खरे असले तरी एका आत्महत्येमुळे केवळ एक शेतकरी कुटुंब उद्ध्वस्त होत नाही, तर इतर किमान दहा कुटुंबांना शेतीमाल पुरविण्याची यंत्रणा उद्ध्वस्त होते, भुकेचे आव्हान तितक्याच प्रमाणात उग्र होते, याचे भान कुणीच ठेवत नाही. उलट, आत्महत्या सरकारी कर्जामुळे की खासगी सावकारीमुळे (पोलिसांना खासगी सावकारीचा उल्लेख पंचनाम्यात केलाच पाहिजे, असे अलिखित आदेशच आहेत.), की एड्समुळे (जणू काही पूर्वी असाध्य रोग होतच नव्हते!), की मानसिक व्याधीमुळे (याही पूर्वी नव्हत्याच?), याचीच क्रूर चर्चा चालू राहते. कुटुंबाला एक लाख रुपये विनासायास मिळतात म्हणून आत्महत्या होतात, असे निर्लज्ज विधानही एका चर्चेत ऐकायला मिळाले होते! स्वातंत्र्य मिळाले तेव्हा अन्नधान्याची टंचाई हा देशाच्या हाडीमासी खिळलेला रोग होता. ते युद्ध जिंकून देशाला ज्यांनी केवळ अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी केले नाही, तर अन्नधान्य निर्यात करता येईल इतके श्रीमंतही केले, ते शेतकऱ्यांचे सैन्य आज रणांगणातून मागच्या मागे पळ का काढते आहे?

देशाची साठ टक्के लोकसंख्या (६० ते ६५ कोटी) अजूनही शेतीप्रधान ग्रामीण भागातच आहे. म्हणजे साधारण १२-१३ कोटी कुटुंबे झाली. कर्जाच्या



खात्यांची संख्याही १२ कोटींच्या आसपास आहे. यातल्या निम्म्या कुटुंबांमधून प्रत्येकी एकजण जरी शहराकडे आला, कारण काही मागास राज्यांत सुखाने जगता येण्यासारखी शहरे कमी आहेत. तरी शहरांची लोकसंख्या पाच-सहा कोटींनी वाढेल. त्यातल्या निम्म्या स्थलांतरितांनी कुटुंबासकट शहरातच राहायचे ठरवले तर शहरांच्या लोकसंख्येत आणखी दहा-बारा कोटींची भर पडेल.. तेही तीन जणांचे एक कुटुंब धरले तर! या रेट्यासमोर आजच गर्दीच्या ओझ्याखाली गुदमरणाऱ्या शहरांची काय अवस्था होईल?

तरुण, कर्तृत्ववान शेतकरी जर शहराकडे धावत राहिले तर शेतीकडे अकार्यक्षम म्हातारी माणसे किंवा सामान्य बुद्धीचे तरुणच उतरतील आणि ती शेती योग्य नियोजन व कार्यक्षमता नसल्याने आणखीनच तोट्याची होईल; त्या प्रमाणात उत्पादन घटेल. आणि कदाचित पुन्हा अन्नधान्याची टंचाई जाणवू लागेल. काही वर्षांपूर्वी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी (जॉर्ज बुश) भारतातल्या लोकसंख्येची वाढती भूक अन्नधान्याचा तुटवडा निर्माण करते आहे अशी तक्रार केलीच होती! आज आपण अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण असताना जर असे बोलले जाते, तर त्याही विषयात परावलंबी झाल्यावर भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान उपलब्ध करून देताना श्रीमंत देश आपली काय पत्रास ठेवतील? शेती समृद्ध होऊन शेतीमधून माणसे बाहेर पडणे ही विकासाची जुनी व्याख्या सर्वांना माहीत आहे. ती योग्यही आहे. मात्र वैफल्यामुळे शेतीमधून बहुसंख्येने माणसे बाहेर पडणे हे आर्थिक/सामाजिक गंडांतरच आहे; त्याचा वेळीच मुकाबला करायला हवा तो बिगर शेतकरी वर्गाने करायला हवा!

हे गंडांतर अचानक कोसळलेले नाही. त्याच्यामागे हजार बाराशे वर्षांचा लुटीचा इतिहास आहे. इ.स. ७०० ते १०००/११०० या काळात देशातील संपत्ती लुटारू आक्रमकांनी देशाबाहेर नेली, नंतरच्या ४००/५०० वर्षांत ती बाहेरून इथे येऊन स्थिरावलेले राजे-रजवाडे व त्यांचे विलासी सरदार/जमीनदार यांच्या हातात स्थिरावली. त्यांच्यामधल्या लढायांनी, फौजांच्या येण्या-जाण्याने कायमच शेतीची धूळदाण झाली- घोड्यावरून जाता जाता मांडीवर हुरडा चोळून खाणारे बाजीराव देशभर धुमाकूळ घालत राहिले, व्यापारासाठी आलेल्या युरोपियनांनी या धुमाकुळात भरच घालून शेतकऱ्याला जास्तच असुरक्षित केले, वसाहतवादाच्या काळात कच्चा माल स्वस्त व पक्का माल महाग या सूत्राने इंग्रजाने दुधारी शस्त्राने लुटले, शिवाय भारतातल्या प्रशासनावर अवाच्या सव्वा खर्च करून तोही भारतीय जनतेकडून (८०% शेतकरी) वसूल केला, सैन्याचा खर्चही आपल्याच माथी मारला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही वसाहतवादी धोरणेच राबविली गेली. औद्योगीकरण झपाट्याने व्हावे म्हणून शेतीक्षेत्राकडे सापत्नभावाने पाहिले गेले. शेतीवर इन्कम टॅक्स असणार नाही, असे पूतनामावशीचे प्रेम शेतकऱ्यांच्या वाट्याला येऊन शेतकरी अर्थव्यवस्थेमधील इतर उत्पादकांच्या तिरस्काराचा विषय बनले. उत्पादनखर्चाच्या ५५-६० टक्के भावपातळी ठेवण्यात आली. तूट असेल तेव्हा लूट (लेव्ही पद्धत), मुबलकता असेल तेव्हा लिलाव (शेतकऱ्यांनी कांदे, दूध वगैरे रस्त्यावर ओतून देणे, उसाचे फड पेटवणे) हे धोरण.. शेतमालाची आयात करून भाव पाडणे, निर्यातबंदी घालणे (नुकतेच घडलेले कापसाचे उदाहरण आठवून

तरुण, कर्तृत्ववान शेतकरी जर शहराकडे धावत राहिले तर शेतीकडे अकार्यक्षम म्हातारी माणसे किंवा सामान्य बुद्धीचे तरुणच उतरतील आणि ती शेती योग्य नियोजन व कार्यक्षमता नसल्याने आणखीनच तोट्याची होईल; त्या प्रमाणात उत्पादन घटेल. आणि कदाचित पुन्हा अन्नधान्याची टंचाई जाणवू लागेल. काही वर्षांपूर्वी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी (जॉर्ज बुश) भारतातल्या लोकसंख्येची वाढती भूक अन्नधान्याचा तुटवडा निर्माण करते आहे अशी तक्रार केलीच होती! आज आपण अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण असताना जर असे बोलले जाते, तर त्याही विषयात परावलंबी झाल्यावर भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान उपलब्ध करून देताना श्रीमंत देश आपली काय पत्रास ठेवतील?



पाहावे.), राज्यबंदी, जिल्हाबंदी, हरामखोर साखरसम्राटांसाठी झोनबंदी, सहकारी बँकांचा खासगी मालमत्तेसारखा वापर.. या गंडांतराची ही काळी कहाणी न संपणारी आहे. आधीच भारतीय शेतीची उत्पादकता हजारो वर्षे जमीन कसल्यामुळे कमी झालेली. पावसाच्या लहरीपणापुढे शेतकऱ्यांनी हात टेकलेले. वीज-पाणी-रस्ता-बियाणे-खते-शेतमजूर हे सगळेच इनपुट्स उपलब्धच नसणे किंवा न परवडणारे होणे. बँका- साखर कारखाने- पतसंस्था या शेतक ऱ्यांना कर्जबाजारी करून नागवण्यासाठी टपून बसलेल्या. राजकीय पक्ष एकजात ग्राहकधार्जिणे! इतक्या संकटांना तोंड देऊन शेतीवर इतके लोक टिकून राहिले हे त्यांच्या शेतीनिष्ठेचे नव्हे, गुलामगिरीचे, पर्यायहीनतेचे गमक आहे. असा शेतकरी आर्थिक उदारीकरणाच्या काळात पूर्णपणे उघडा पडला. टोकाचे वैफल्य आलेल्यांनी मग आत्महत्या केल्या. त्यांना खरे तर कर्जबळी किंवा शेतीबद्दलच्या अनास्थेचे बळी म्हणायला हवे. उरलेले शेतीमधून संधी मिळताच पळ काढताहेत. गळ्यापर्यंत पाणी कायमच होते, डोक्यावरून जायच्या आधी प्रवाहाबाहेर उडी मारली तरच निभाव लागेल.

या गंडांतराचा आकार पाहूनच त्यावर उपाय करावे लागतील. भारतीय शेती तुकड्या-तुकड्यांची आहे म्हणून तोट्यातच राहणार; पारंपरिक पद्धती बदलल्या पाहिजेत; पाणी-वीज काटकसरीने वापरावे; सेंद्रिय खते वापरावीत; जोडधंदे करावेत; दलालांचे उच्चाटन करून शेतकऱ्यांनी थेट ग्राहकांपर्यंत स्वतः माल आणावा; ग्राहक मात्र उत्तम मालासाठी शेतकऱ्यांपर्यंत जाणार नाहीत; गेलेच तर माल कवडीमोल किमतीत मागतील. वेगवेगळी पिके घेऊन जमिनीची पत सुधारावी.. या जुन्याच मात्रा पुन्हा उगाळून काही फरक पडणार नाही. माळरानावर नंदनवन फुलवले, पपई घेऊन एका एकरात लाख रुपये कमावले - असल्या कथांमुळे अपवादाने मूळ नियमच सिद्ध होतो- कारण सलग पाच-दहा वर्षे विचारात घेतली तर तेजी-मंदीमुळे एकूण उत्पन्न (उत्पादन नव्हे!) तेवढेच राहते, हा अनुभव आहे. एकविसाव्या शतकात जमिनीवरची शेती कालबाह्य ठरेल, अत्याधुनिक एरोबिक शेतीचे तंत्र व अर्थशास्त्र वेगळेच असेल, या मुद्द्यांतही (जरी दोन्ही शरद तो मांडत असले तरी!) फारसा दम नाही. कारण बहुसंख्य भारतीय शेतकरी तुकड्या-तुकड्यांची, लहरी हवामानावर अवलंबून असलेली, त्या- त्या भागातल्या ठरावीक (जी जमीन व हवामानामुळे ठरतात!) पिकांचीच शेती करणार व जवळच्या बाजारात माल विकणार- हेच वास्तव दीर्घकाळ असणार आहे. संकटसमयी नुकसानभरपाईची व्यवस्था करणे, चार-पाच जिल्हे निवडून मदतीचे पॅकेज देणे, आत्महत्या झाल्यावर आर्थिक साहाय्य करणे, या उपायांतून प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या हातात फारसे काही पडत नाही. किंचित दिलासा मिळतो, इतकंच. पॅकेजेस वा कुटुंबाला दिलेली मदत बँकांची गिधाडेच गिळंकृत करतात. अर्धवट कर्जमाफी देऊन प्रश्न सुटत नाही. १९८९ मध्ये शेतकरी संघटनेच्या दबावामुळे व्ही. पी. सिंग सरकारने सरसकट दहा हजार रुपये माफ केले होते. मनमोहनसिंग सरकारने चार-पाच वर्षांपूर्वी प्रथम ६० हजार व नंतर ११ हजार कोटी रुपये कर्जमाफीसाठी दिले होते. त्यातून फक्त १/३ कर्जबाजारी शेतकऱ्यांना लाभ झाला होता. हे ७१ हजार कोटीही पूर्णपणे खर्च झाले नाहीत, अशी चर्चा कानावर येते. कुत्र्याचे शेपूट एका घावातच तोडायचे असते; त्याचप्रमाणे या समस्येवर रंगसफेदीचे उपाय न करता निग्रहाने जबरदस्त आघात व्हायला हवा. शेतकऱ्यांचे वैफल्य घालविण्यासाठी देशांतर्गत आणीबाणी जाहीर करून आर्थिक, राजकीय व सामाजिक अशा तिन्ही आघाड्यांवर लढाई झाली तरच ही समस्या आटोक्यात आणता येईल.

## आर्थिक उपाययोजना

१) सर्व कर्जे सरसकट माफ करावीत. यासाठी एक लाख कोटींची तरतूद करावी लागेल.

२) कर्जमाफीचा फायदा प्रथम बँकांना मिळणार आहे; वैयक्तिक शेतकऱ्याला नाही. त्यासाठी एक लाख कोटी रुपयांचा पतपुरवठा करावा लागेल.

३) पाणी-वीज-रस्ते यांची शाश्वत उपलब्धता निर्माण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी पुन्हा एक लाख कोटी बाजूला ठेवावे लागतील.

४) वरील तीन उपायांत नैसर्गिक आपत्ती आल्यास शेतीसाठी विशेष तरतूद केलेली नाही. गेली दहा वर्षे तरी एकूण पर्जन्यमान सरासरी गाठत असले तरी त्याच्या लहरीमुळे पूर येणे, पेरण्या जळणे/ वाहून जाणे, तयार पिकावर पाऊस पडून नुकसान होणे हे प्रकार वाढत आहेत. यासाठी

निदान ५० हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल.

५) वीज-पाणी-रस्ते हे प्राथमिक इन्फ्रास्ट्रक्चर झाले. परंतु आधुनिक शेती करण्यासाठी, बाजारभावाची माहिती त्वरित मिळण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचे जाळे ग्रामीण भागात न्यावे लागेल. त्यासाठी ५० हजार कोटी लागतील.

या सर्व योजना सरकारने करायच्या आहेत. भ्रष्टाचार व दप्तरदिरंगाई जमेस धरून साधारण पाच लाख कोटी रुपये शेतक ऱ्यांसाठी उपलब्ध करावे लागतील. ही रक्कम वरकरणी अवाढव्य वाटते; पण तीन प्रकारची आकडेवारी पाहिली तर ती उभी करणे अवघड नाही हे कळेल. १) ग्रामीण रोजगार योजनेसाठी ५० हजार कोटी रुपयांची वार्षिक तरतूद असतेच. पाच वर्षांचे अनुदान एकत्र धरले तरी २.५ लाख कोटी (५० टक्के) रक्कम उपलब्ध होते. २) गेल्या ६० वर्षांत देशात ५०० पेक्षा जास्त घोटाळे (स्कॅम्स) झाले; त्यात बुडालेल्या रकमेचा अंदाज ९० लाख कोटी रुपये इतका आहे. कदाचित हा अंदाज अवास्तव असेलही; पण त्यातले दहा टक्के जरी वसूल केले तरी वरील उपायांनी शेतकऱ्यांना दोन वेळा कर्जमुक्तकरता येईल. ३) कर्जमाफीचा काही वाटा राज्य सरकारांकडे वळवता येईल. सहकारी बँकांच्या भ्रष्टाचारावर, अवाच्या सवा व्याज लावण्याच्या पठाणी सवयीवर राज्य सरकारे नियंत्रण आणू शकतील. याशिवाय काळा पैसा शोधून काढून त्याचे शेतकरी रोख्यांत रूपांतर करून ही रक्कम उभी करता येईल. त्यासाठी भांडवलदारांकडे गावे दत्तक घेण्यासाठी किंवा साधे संडास बांधण्यासाठी जागतिक बँकेकडे भीक मागण्याची गरज नाही.

याशिवाय शेतीसाठी वायदे बाजार खुला करून त्याची अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचेल अशी व्यवस्था करणे, सर्व प्रकारचे निर्बंध उठवणे, अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया व दूध (शेतकरी संघटनेने अशी १६ पिकांची यादी पूर्वी बनवली होती.) यांचे भाव निदान दहा वर्षांसाठी स्थिर ठेवण्याची हमी घेणे, प्रत्येक वर्षी मान्सूनच्या अंदाजाबरोबरच त्यावर्षीचे कृषीविषयक आयात-निर्यात धोरण जाहीर करणे (म्हणजे शेतक ऱ्यांना योग्य ती पिके निवडता येतील.).. असे अनेक उपाय करावे लागतील. सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे मध्यम शेतकरी हा शेती व्यवस्थेचा कणा आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल.

## राजकीय उपाय

१) सर्व राजकीय पक्षांनी शेतक ऱ्यांच्या वैफल्याचा मुद्दा पक्षीय राजकारणाबाहेर ठेवावा.

२) वरील उपाययोजनांचा विचार करून एक पक्षनिरपेक्ष राष्ट्रीय शेतकरी धोरण ठरवावे.

३) शेतीप्रधान क्षेत्रातल्या अल्पसंख्यांचे प्रश्न पुढे रेटून शेतमजूर, आदिवासी, भटके विमुक्त- आधीच मोडकळीस आलेल्या गावांची पुरती दुर्दशा करू नये. शेतकरी वाचला तरच आपलाही निभाव लागेल, हे त्यांनी ओळखावे.

४) सध्याचे सर्व राजकीय पक्ष ग्राहकसन्मुख आहेत. ते योग्यही आहे. मात्र, शेतकऱ्यांकडे ते उद्याचा ग्राहक म्हणून पाहत नाहीत. आज देशभरातल्या ग्राहकांची संख्या तीस कोटींच्या आसपास आहे. शेतकऱ्यांच्या हाती क्रयशक्ती आली तर ग्राहकांची संख्या निदान दुप्पट होऊन आर्थिक वाढीला मोठी चालना मिळेल; हे राजकीय पक्षांनी ओळखावे.

५) विद्यार्थी, कामगार, महिला, दलित, अल्पसंख्याक यांच्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षात आघाडय़ा असतात. निदान सेल तरी असतो. शेतकऱ्यांसाठीही तशीच व्यवस्था केली तर सर्वच राजकीय पक्षांची ग्रामीण पाळेमुळे पक्की होतील; आणि त्यांना शेतकऱ्यांच्या समस्यांचे वास्तव भान येईल.

## सामाजिक उपाय

१) नोकरदार, शहरी, सुशिक्षित नागरिकांनी शेतकऱ्यांकडे उपेक्षेने पाहण्याची सवय सोडणे; देश आपण चालवतो, शेतकरी हा अर्थव्यवस्थेवरचा बोजा आहे या दंभातून बाहेर येणे आवश्यक आहे.

२) शेतकऱ्याला व पर्यायाने ग्रामीण भागाला 'एवढे मिळाले की पुरे झाले.' कारण 'त्यांच्या गरजा मर्यादित असतात...' ही भाषाही बंद होऊन शेतकरी उत्पादक / उद्योजक आहे व त्यालाही आपल्यासारखे राहता आले पाहिजे, ही वृत्ती निर्माण व्हायला हवी.

३) शेती, शेतीचे अर्थशास्त्र, शेतीमधली अनिश्चितता याविषयी शहरी नागरिकांचे घोर अज्ञानही दूर करणे आवश्यक आहे. 'आमच्याकडे भैय्या दूध देतो' हा बालीश विनोद झाला; पण 'मुबलक पीक आले तरी (माल खूप आहे म्हणून) आणि टंचाई असली तरी (भाव चढले म्हणून) शेतकरी मालामाल होतात हा 'पढतमूर्ख'पणा झाला. शेतकरी व शेतमालाचे ग्राहक यांना एकत्र आणण्याची गरज आहे. त्यासाठी दलालांना शत्रू लेखणे मात्र चूक आहे, कारण तेही अर्थव्यवस्थेचे परंपरागत घटक आहेत. तरीही शेतकरी जीवनाचे प्रत्यक्ष आर्थिक वास्तव (यामधून ग्रामीण साहित्यिक वगळणेच सध्या योग्य ठरेल!) ग्राहकांसमोर मांडण्यासाठी चर्चा, परिसंवाद, प्रश्नोत्तरे, वृत्तपत्रीय स्तंभलेखन असे उपक्रम तातडीने सुरू व्हायला हवेत.

४) ३० वर्षांपूर्वी लढाऊ असलेल्या व आता तुलनेने थकलेल्या शेतकरी संघटनेच्या प्रौढ कार्यकर्त्यांना यासाठी खूप काही करता येईल. मात्र, त्यांनी पगारदार ग्राहक हा आपला शत्रू आहे, ही वृत्ती सोडली पाहिजे.

५) पडीक जमीन लागवडीखाली आणून शेतीउत्पादन अजून वाढवावे, आर्थिकदृष्टय़ा तळात असलेल्या शेतक ऱ्यांना आधी मदत करावी, बिगर-शेतकरीवर्गाने ग्रामीण भागात उद्योग सुरू करावेत, सेझमुळे शेतीउत्पादनही घटेल व शेतकरी देशोधडीला लागतील, हे व असे अनेक भ्रम दूर करणेही गरजेचे आहे.

शेती व शेतकऱ्यांवर चालून आलेल्या गंडांतराचे हे ओझरते दर्शन आहे. यावर विचार व्हावा व परिस्थिती हाताबाहेर (उशीर झालाच आहे!) जाण्याआधी संकटाचा मुकाबला सुरू व्हावा, हाच यामागे उद्देश आहे. ३०-३५ वर्षांपूर्वी इंदिरा गांधींनी देश वाचवण्यासाठी (वस्तुतः स्वतःला व काँग्रेसला तारण्यासाठी!) देशांतर्गत आणीबाणी लागू केली होती. तिथून माझे राजकीय जीवन सुरू झाले. आज मी शेतकऱ्यांचे जीवघेणे वैफल्य दूर व्हावे म्हणून पुन्हा देशांतर्गत आणीबाणी जाहीर करा, म्हणतो आहे. कारण या आणीबाणीमुळे योग्य पावले उचलली जातील व देश वाचेल, असा माझा ठाम विश्वास आहे.

*(दै. लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, दि. १० जून २०१२ मधील लेखाचे विस्तारीत रूप)*

**विनय हर्डीकर**

*मो. ९८९०१६६३२७*

■■

# कहती है बुढीया

तुमचं खरं आहे अशोकराव, खरंच तुमचं खरं आहे. पण तुम्ही कितीही कंठशोष करून का कंठरवानं का काय असं म्हणतात ना तसं म्हणालात तरी तुमचं ऐकणार कोण आहे? तुमच्या बाबतीत या माळावर एकही वृक्ष नसे बा रे खुळ्या अशोका, असंच म्हणावं लागेल. काही झालं तरी तो आदर्श तुम्हाला आडवा येतो आहे ना! त्यामुळे तुम्ही कितीही खरं बोललात तरी ते लांडगा आला रे आला असंच व्हायला लागलंय आजकाल.

तुमच्या प्रमाणेच आम्हालाही एक कोडं पडलं आहे राव. तुम्हीच नाही तर महाराष्ट्राचे पृथ्वीबाबाही मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरून नाराजी व्यक्त करताहेत. आता बाबासारख्या दिल्ली दरबारातून आलेल्या खास माणसाचीही जिथं डाळ शिजत नाही, तिथे तुमचा काय पाड? पण सवाल असा आहे राव, की तुम्ही एवढं आवर्जून सांगत असतानाही 'घड्याळा'नं वर काय जादू करून ठेवली आहे कोण जाणे? तुमच्या आवाजाला काही किंमतच दिली जात नाही. आणि वर 'हातानं' 'घड्याळाच्या' डोक्यावर आशीर्वादाचा 'हात' धरला आहे तो आहेच. वास्तवात 'घड्याळा'ची अलार्म घंटी 'हातात' असायला पाहिजे. इथे तर 'घड्याळ' ऊठसूट अलार्म वाजवतं आणि 'हाताची' बोटं मात्र राहतात कानातच.

बाकी 'घड्याळ' लई हुशार. 'घड्याळश्री' तर तारेवरची कसरत करण्यात लई वस्ताद. कुंपणावर बसलेले अन् कोणती बाजू भारी होते आहे हे हेरून बरोबर वजनदार पारड्यात आपलाही पासंग टाकणारे. त्यांचा हा पूर्वेतिहास माहीत असूनही 'हात' सम्राट किंवा सम्राज्ञी जो कोणी वा ज्या कुणी असतील ते वा त्या 'घड्याळश्री'वर विश्वास कसा काय टाकतात ते देव अन् ते किंवा तीच जाणे.

आता 'हाता'ची नाव पाण्यात बुडते आहे हे उघडच झालेलं आहे. प्रश्न आहे तो फक्त वेळेचा आहे. काही भलंबुरं घडलं नाही, तर ही नाव जनमताच्या तळाशी जाणार हे तर स्पष्टच झालंय. तुम्ही कदाचित विचाराल हे विधान आम्ही कशावरून करतो आहोत. असं बघा, बोट बुडू लागली की आधी उंदरं त्यातून बाहेर पडतात म्हणे. आता आम्ही कधी बुडणाऱ्या बोटीला आमचे पाय लावले नाहीत. त्यामुळे उंदीर बाहेर कसे पडतात? आणि बाहेर पडले तरी समुद्रात बुडत कसे नाहीत. याबद्दल आम्ही काही बोलू शकत नाही. पण इंग्रजीतल्या काही दर्यावदी कथांत तसा उल्लेख आहे. त्यामुळे तो खरा असावा असं समजायला काही हरकत नाही. नाही असं बघा, इंग्रजांना आपण खोटं कसं काय म्हणणार हो. काही झालं तरी इंग्रज ते इंग्रजच.

इथे परत तुम्ही विचारणार की हे सर्व ठीक आहे. उंदीर बाहेर पडतात हे आपलं म्हणणं जे आमचं म्हणणं आम्ही म्हणजे ते मान्य करतील; पण ही नाव सोडून बाहेर पडतंय तरी कोण? हे मात्र बरोबर विचारलंत! संप्रग सरकार म्हणजे अनेक पक्षांचं एक कडबोळं. त्यातला प्रमुख पक्ष म्हणजे 'हात' म्हणजे या बुडू पाहणाऱ्या नावेचा कप्तान. दर्यावर्दी कथांप्रमाणे कप्तान जहाज सोडणारा शेवटचा प्राणी समजला जातो. या कडबोळ्यातील घड्याळानं आधी अलार्म वाजवायला सुरुवात केली. 'घड्याळश्री' कुंपणबहाद्दर आहेत हे तर सर्वज्ञात आहे. ते आपली धोरणं फार आधीपासून टप्प्याटप्प्याने जाहीर करत असतात. काही महिन्यांपूर्वी त्यांनी असं जाहीर केलं, की यापुढे पार्लमेंटची निवडणूक त्यांना लढवायची नाही. मात्र आपण विधानसभेची निवडणूक लढवणार नाही असं तर त्यांनी म्हटलेलं नाही. म्हणजे तेव्हापासून हाताचं जहाज बुडणार आहे, हे त्यांच्या चतूर नजरेनं त्यांनी हेरलेलं होतंच आणि येऊ घातलेल्या कडबोळ्यात स्थान मिळेल किंवा नाही, याबाबत मनात शंका असल्यामुळे राज्याची घसरती अवस्था सावरण्यासाठी आपण राज्यात परतायचा निर्णय घेत आहोत, असं जाहीर करायची संधी त्यांनी निर्माण करून ठेवली आहे. मात्र आपल्या या धोरणाची झलक त्यावेळी त्यांनी कुणाला येऊ दिली नाही; पण पुढच्या काळात झालेल्या निवडणुका आणि घोटाळे भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे यांमुळे हाताच्या नावेला खूपच छिद्र पडले. पाणी मोठ्या प्रमाणात शिरायला सुरुवात झाली तेव्हा पुढचं पाऊल उचलायची वेळ आली आहे हे घड्याळश्रीच्या लक्षात आलं आणि त्यांनी थेट महाराष्ट्र सरकारवर जाहीर टीका करायला सुरुवात केली.

तसे घड्याळश्री लई हुशार. टीका अशा वेळी आणि ठिकाणी केली की ती टीका कुणावर आहे याबद्दलच संभ्रम निर्माण व्हावा. सरकारात राहून सर्व लाभांचा फायदा मिळवून परत त्याच सरकारवर टीका करायला मुत्सद्देगिरीच लागते. तसे घड्याळश्री म्हणजे या मुत्सद्देगिरीच्या खेळात प्रवीण. त्यांच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे कसंही फेकलं तरी बरोबर पायावर पडणारी एक बाहुली पूर्वी मिळायची. बस घड्याळश्री म्हणजे अगदी तसे. कशीही परिस्थिती येऊ द्या गडी सत्तेत आहेच. रामदेव बाबाशी गळाभेट करायची अन् मनमोहनशी हस्तांदोलन करायचं तेही एकाच वेळी. आयपीएलच्या चिखलातही यांचं कमळ मात्र फुललेलंच.

तर काय मुद्दा हा की, बोट बुडायला लागली आहे म्हणून उंदीर बाहेर पडत आहेत. हे कुणाच्या लक्षात येवो किंवा न येवो अशोकरावांच्या बरोबर लक्षात आलं. पण त्यांच्या लक्षात येऊन काय उपयोग! त्यांचं म्हणणं भलेही अनेक 'हातांना' पटलेलं आहे, पण हे सारे 'हात' म्हणजे कळसूत्री बाहुल्यांचे हात. वर बसलेल्या पडद्यामागच्या 'हाता'नं आधी निर्णय घ्यावा आणि मगच खालच्या 'हातांना' हलवाहलव करायची मोकळीक मिळावी; पण प्रश्न अडतो तो तिथेच. 'मांजरी'च्या गळ्यात घंटा बांधायची कुणी?

आणि हे बघा आपलं साफ साफ सांगून ठेवतो. 'मांजर' म्हणताना कुणा पडद्यामागच्या स्त्रीला 'मांजर' म्हणायचा आमचा उद्देश नव्हता आणि नाहीही. आपली तशी हिंमतच नाही. अहो, जिथे देशाचे पंतप्रधान त्या संदर्भात काही बोलण्यापूर्वी शंभर वेळा विचार करतात किंवा केवळ विचारच करत असावेत असं आपण समजून घ्यावं. तिथं आम्हा पामरांचा काय बरं पाड? पण आम्ही मांजर हा शब्द वापरला तो केवळ एक तसा वाक्प्रचार आहे म्हणूनच. नाहीतर जिकडे बोट दाखवायचीसुद्धा बड्याबड्यांची हिंमत नाही तिथे आम्ही पामर 'मांजर' म्हणून पडद्यामागच्या कुणा स्त्रीला म्हणणार तरी कसे बरे?

जाऊ द्या झालं. आमची गाडी सुटली होती ती बुडणारी बोट आणि बोट सोडणाऱ्या उंदरावरून. तुम्हाला कदाचित असा प्रश्न पडला असेल की, ज्या झाडावर घड्याळश्री बसले आहेत. त्याच झाडावर ते कसे बरे घाव घालतील? पण हे बघा, जरा पुरातन काळ आठवा. तो कुणी कालिदास नावाचा एक महान विद्वान, लेखक, द्रष्टा आदी असाच ज्या फांदीवर बसला होता तीच फांदी तो तोडत होता. पण पुढे तोच कालिदास महान कालिदास बनलाच की नाही! तसंच 'घड्याळश्री' आज ज्या झाडावर आरामात बसलेले आहेत, त्याच झाडावर घाव घालून ते तोडण्यात यशस्वी झाले तरी त्याच झाडाच्या बुंध्याला परत नवीन पालवी फुटायची वाट पाहू शकतात आणि नवीन कालिदासच काय, पण मनमोहनही बनू शकतील. तेही नाही जमलं, तरी निदान गेलाबाजार पृथ्वीराज बाबा बनायला काय वांधा आहे? तेव्हा अशोकराव तुम्ही कितीही ओरडा कहती है बुढीया सुनता है कौन?

■■

# विकासाच्या वाटेवर स्वयंसेवी काटे



सुधाकर जाधव

गेल्या वर्षभरात अण्णा आंदोलन, तामिळनाडू प्रांतातील कुडमकुलन येथील अणुऊर्जा प्रकल्पविरोधी आंदोलन आणि सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे निर्णय या तिन्ही संदर्भात स्वयंसेवी संस्थांनी बजावलेल्या भूमिकेमुळे गैरसरकारी स्वयंसेवी संस्था हा चर्चेचा विषय बनल्या आहेत. अण्णा आंदोलन सुरू होईपर्यंत स्वयंसेवी संस्थांकडे पैशांचा निचरा करणाऱ्या संस्था म्हणून सर्रास पाहिल्या जायचे; पण अण्णा आंदोलन उभे करण्यात केजरीवाल-बेदी-शिसोदिया या संस्थाधिपतींनी बजावलेल्या निर्णायक भूमिकेने भोळीभाबडी जनता अशा संस्थांकडे आदरमिश्रीत कुतूहलाने पाहू लागली आहेत. पूर्वी हा आदर आणि कुतूहल फक्त मोजक्या संस्थांच्या वाट्याला यायचा आणि तोसुद्धा ठराविक वर्गाकडून. मध्यम आणि उच्चमध्यमवर्गीय समाजात अशा संस्थांचे चाहते मोठ्या प्रमाणात दिसायचे. स्वतःच्या आत्मकेंद्रीत समाज व अर्थकारणाची बोचणारी सल अशा संस्थाना मदत करून कमी करण्याचे प्रयत्न या वर्गांकडून नेहमीच होत आला आहे. याचे ठळक उदाहरण म्हणजे बाबा आमटे यांनी स्थापन केलेले आनंदवन आहे. पण जिथे पैसे न देता फक्त कौतुक करून अपराधी भावना कमी होत असेल तर अशा संस्था या वर्गाच्या विशेष लाडक्या बनतात. याचेही आपल्याकडील उदाहरण द्यायचे झाले तर डॉ. राणी आणि अभय बंग यांच्या 'सर्च' संस्थेचे देता येईल; पण आपल्या कार्य आणि कर्तृत्वाने काही संस्थांनी कमावलेला आदर अण्णा आंदोलनाने बराच व्यापक केला. अगदी चोरट्या संस्थांनादेखील यामुळे लाभ झाला. किरण बेदींची संस्था याचे ठळक उदाहरण आहे; पण स्वयंसेवी संस्था सध्या प्रकाशझोतात आहेत याचे कारण त्यांचे सत्कार्य वा कुकार्य हे नसून त्यांनी विकास, प्रशासन आणि शासन या क्षेत्रात पाय पसरायला सुरुवात करून सरकारचे निर्णय प्रभावित करण्याची घेतलेली भूमिका हे आहे. पूर्वी स्वयंसेवी संस्था सरकारवर प्रभाव पाडीत नसत असे नाही. अनेक बाबतीत सरकारच त्यांची मदत घ्यायचे. त्यांच्या सल्ल्याने धोरण ठरवायचे. परस्पर सौहार्द आणि विश्वासातून अशी धोरणे निश्चित होत. रोजगार हमी योजना, माहिती अधिकार किंवा ग्राहक संरक्षण कायदा ही सरकार व स्वयंसेवी संस्था आणि संघटना यांच्यातील परस्पर संवाद आणि सौहार्द याचेच फळ मानता येईल. गेल्या काही वर्षांत मात्र स्वयंसेवी संस्था आणि सरकार यांच्यातील मधुचंद्र संपुष्टात आल्याचे चित्र आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सरकार आपले अधिकार सोडायला तयार नाही आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये अधिकार गाजविण्याची लालसा निर्माण झाली आहे. केवळ लालसाच निर्माण झाली नसून ती लालसा पूर्ण करून घेण्याची ताकददेखील या संस्थांमध्ये आली आहे. गेल्या तीन दशकांतील आर्थिक, राजकीय घडामोडींचे हे फलित आहे.

### स्वयंसेवी संस्थांचा प्रवास

७० च्या दशकापर्यंत उपजीविकेसाठीच्या कामाकडे दुर्लक्ष करून जे लोक समाजकार्यात उत्साहाने सहभागी व्हायचे त्यांची त्या कामाचा मोबदला मिळावा अशी अपेक्षा नसायची. किंबहुना असा मोबदला घेणे त्यांना अनुचित आणि अप्रतिष्ठा करणारे वाटायचे. समाजासाठी आपण काम करतो तेव्हा समाज आपल्याला वाऱ्यावर सोडणार नाही अशी बेफिकिरी वृत्ती असायची. आपली संस्था, संघटना सरकार दरबारी रजिस्टर करायलादेखील विरोध असायचा. सरकारी जाळ्यात आपण अडकू आणि करायचे ते काम होणार नाही ही भावना होती. उद्योगपती किंवा सरकारची मदत नकोच असल्याने संस्था नोंदणी न केल्याने विशेष फरक पडत नसे. विदेशी पैसा तर त्यांच्यासाठी अस्पृश्य असायचा. त्यांचा भर प्रत्यक्ष विकासकामे करण्यापेक्षा प्रबोधन आणि त्यातून संघटन व संघर्ष यावर असायचा. म्हणूनच सामाजिक कार्यकर्ते आणि चळवळी यांचे अतूट नाते असायचे; पण ही स्थिती पुढे दोन कारणांनी बदलली. पहिले कारण चळवळीने निराश करणे किंवा चळवळीतून आलेली निराशा हे होते. दुसरे यापेक्षाही महत्त्वाचे कारण होते जागतिकीकरणाचा भारताने केलेला स्वीकार. उपजीविकेचे कौशल्य प्राप्त करण्याच्या वयात चळवळीवर भर दिल्याने चळवळ थंडावल्यावर किंवा संपल्यावर काय करायचे हा प्रश्न स्वयंसेवी संस्था स्थापन करून सुटू लागला. पूर्वीच्या संस्था-संघटना कामासाठी, चळवळीसाठी असल्याने त्याचे स्वरूप वेगळे होते; पण नंतरच्या संस्था-संघटना निर्मितीत समाजकारणापेक्षाही उपजीविका महत्त्वाची बनली. जागतिकीकरणाचा प्रारंभ झाल्यानंतर तर चळवळी कालबाह्य झाल्यासारख्या अस्तंगत होत गेल्या. स्वयंसेवी संस्थांचे पीक फोफावणे आणि जागतिकीकरण याचा असा हा संबंध आहे. जागतिकीकरणाने आणखी एक गोष्ट घडली. परकीय पैसा देशात येण्यावरची बंधने सैल झाली. याचे सर्वांत मोठे लाभार्थी ठरले ते स्वयंसेवी संस्थांचे जग! आज भारतात सुमारे साडेतीन कोटी नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून त्यांची आर्थिक उलाढाल अरबो डॉलर्सच्या घरात आहे. यामुळे कार्यकर्ता व स्वयंसेवी संस्था यांचे चरित्रच बदलून गेले आहे. आरक्षण न करता रेल्वेने प्रवास करणारा कार्यकर्ता जीवघेण्या गर्दीत पेपर अंथरून झोपी जायचा. रेल्वेस्टेशन वर असाच झोपी गेलेला अरविंद केजरीवाल यांचा फोटो अण्णा आंदोलनाच्या काळात लोकचर्चेचा आणि कौतुकाचा विषय झाला होता; पण याच अरविंद केजरीवाल यांनी संस्थांच्या पैशावर किती वेळा विमानप्रवास केला याचा कोणी शोध घेतला तर त्याचे डोळे पांढरे झाल्याशिवाय राहणार नाहीत. सरकारी आणि परकीय पैशांचा ओघ ज्या संस्थांकडे वळला त्या संस्थांच्या व्यवहारात आणि उद्योगजगताच्या (कॉर्पोरेट जगत) व्यवहारात आपल्याला विलक्षण साम्य आढळेल. बिचाऱ्या उद्योगपतीच्या स्वतःच्या नावावर काहीच नसते. जे काही असते ते कंपनीचे असते. ते फक्त उपभोगाचे मानकरी असतात. तसेच स्वयंसेवी संस्थातील संस्थापक समाजसेवकाचे असते. त्यांच्या नावावर काहीच नसते. जे काही असते ते संस्थेचे! पण उद्योगपतींना भागधारकाच्या पैशांचा लाभ घेण्यासाठी स्वतःची गुंतवणूक अपरिहार्य असते; पण स्वयंसेवी संस्थांच्या बाबतीत तसे बंधन नसते. उलट पैशाला शिवायलादेखील स्वयंसेवी साधक तयार नसतात. किरण बेदींनी विमानप्रवासाचा पैसा अनेक संस्थांकडून उकळला; पण कधीतरी त्यांनी त्या पैशाला हात लावला का? कधीच नाही. ते पैसे त्यांच्या संस्थेच्या खात्यात गेले. भांडवलदाराचे उत्पन्न जसे कंपनीचे असते तसा हा प्रकार आहे. भांडवलदार आपल्या संपत्तीच्या जोरावर सरकारी धोरणे प्रभावित करतो तोच प्रकार ज्या संस्थांकडे जगभरातून पैशांचा ओघ सुरू आहे त्या संस्थादेखील सरकारी धोरणे प्रभावित करण्याचा प्रयत्न करू लागल्याची उदाहरणे समोर येऊ लागली आहेत. जागतिकीकरणापूर्वी देशात प्रामुख्याने रशिया आणि अमेरिका या दोन राष्ट्रांकडून मोजक्या संस्था आणि संघटनांना पैसा मिळायचा. आपले हीत जोपासण्यात मदत व्हावी हा त्यामागचा उघड हेतू होता. रशियाकडून पैसा घेणाऱ्या कम्युनिस्टांनी काय केले किंवा अमेरिकिन पैशांच्या बळावर जगणाऱ्या संस्थांनी काय केले हे लपून राहिलेले नाही. जागतिकीकरणानंतर अनेक राष्ट्रांनी स्वयंसेवी संस्थांसाठी पैशांच्या थैल्या खुल्या केल्या आहेत. आपले हितसंबंध जोपासण्यासाठीच ते स्वयंसेवी संस्थांना पैसे पुरवीत असावेत अशी रास्त शंका कुडनकुलम प्रकरणावरून येते.

### संशयाच्या भोवऱ्यात स्वयंसेवी संस्था

तामिळनाडूतील कुडनकुलम येथील अणुऊर्जा प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण होत आला असताना एका स्वयंसेवी संस्थेने तेथे दीर्घकाळ विरोध प्रदर्शन आयोजित केले होते. या विरोध प्रदर्शनासाठी या संस्थेला परराष्ट्राकडून पैसा मिळाल्याचा गंभीर आरोप दस्तुरखुद्द पंतप्रधानांनी केला आहे. प्रकल्पासाठीची यंत्र सामग्री रशियाकडून घेतली म्हणून अमेरिकेतील हितसंबंधी कंपन्यांनी स्वयंसेवी संस्थाना पैसा पुरवून हा प्रकल्प बंद पाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप

रशियानेदेखील केला आहे. अमेरिकन सरकारनेदेखील या आरोपांचा स्पष्ट शब्दात इन्कार न करता चौकशीचे गोलमोल आश्वासन दिले आहे. ज्याअर्थी तीन मोठ्या राष्ट्रांचे जबाबदार प्रतिनिधी या प्रकरणी जाहीरपणे बोलत आहेत त्याअर्थी पाणी कोठे तरी मुरते आहे हे उघड आहे. स्वयंसेवी संस्थांकडून परकीय पैशांच्या दुरुपयोगाबद्दल तीन देशांच्या सरकारच्या पातळीवर झालेली ही पहिलीच चर्चा असली तरी असे आरोप पूर्वीही झाले आहेत. दशकभर 'नर्मदा बचाव' आंदोलन चालविणाऱ्या मेधा पाटकर यांच्यावरदेखील असे जाहीर आरोप अनेकदा झाले आहेत; पण त्या बाबतीत समाधानकारक खुलासा अद्यापपर्यंत मेधा पाटकर किंवा त्यांच्या आंदोलनाकडून देण्यात आलेला नाही. लवासा प्रकल्पाच्या प्रवर्तकांकडून या संदर्भात करण्यात आलेल्या ताज्या जाहीर आरोपानंतरही मेधा पाटकर किंवा नर्मदा बचाव आंदोलनाची चुप्पी बुचकळ्यात टाकणारी आहे. देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात कोणताही प्रकल्प सुरू होण्याची घोषणा होण्याचा अवकाश की त्या प्रकल्पाला विरोध करायला मेधा पाटकर आणि त्यांचे सहकारी हजर झाले नाहीत वा त्यांनी तेथे आंदोलन उभे केले नाही असे कधी घडलेच नाही. त्यांच्या या महान कार्यासाठी पैसा कोठून येतो आणि किती येतो हे एक गौडबंगालच आहे. केजरीवाल-शिसोदिया यांच्या संस्थेला अमेरिकेतील फोर्ड फाऊंडेशनकडून मोठ्या प्रमाणावर मदत मिळणे आणि भारत सरकारलाच लुळे करणारे अण्णा आंदोलन उभे राहणे हा कावळा बसणे व फांदी तुटणे असा योगायोग आहे की आणखी काही आहे हे सांगणे कठीण आहे. भारत सरकारने एवढ्यात अनेक स्वयंसेवी संस्थाना परकीय पैसा घेण्यावर बंदी घालून त्यांची चौकशी सुरू केल्याने स्वयंसेवी संस्थांवरील संशयाचे धुके गडद झाले एवढे नक्की. परकीय पैशांच्या बळावर किंवा परकीय राष्ट्राच्या इशाऱ्यावर संबंधित स्वयंसेवी संस्था काम करतात की नाही हा वादाचा मुद्दा बाजूला ठेवला तरी प्रत्येक विकास प्रकल्पाला विरोधच करणे हा एकसूत्री कार्यक्रम देशातील प्रभावी स्वयंसेवी संस्था राबवीत असल्याचे अमान्य करता येणार नाही. देशाची गाडी विकासाच्या रस्त्यावर अडखळू लागण्यामागे जसे सरकारची निर्णय घेण्याची क्षमता लयाला जाणे हे कारण आहे तितकेच महत्त्वाचे कारण स्वयंसेवी संस्थांनी विकासविरोधी उघडलेली आघाडी आहे. विकासाच्या वाटेवर तत्परतेने काटे पेरणे हेच भारतातील प्रमुख आणि प्रभावी स्वयंसेवी संस्थांचा एककलमी कार्यक्रम बनला आहे. ठिकठिकाणी अनेक स्वयंसेवी संस्था राजकीय आकांक्षा न बाळगता विधायक व रचनात्मक कार्यात गुंतल्या आहेत हे खरे; पण त्यांचे कार्य स्वयंसेवी संस्था या विकासविरोधी आहेत हा डाग पुसण्यास पुरेसे नाही.

**स्वयंसेवी संस्थांचे राजकारण**

प्रभावी स्वयंसेवी संस्थाना आता राजकीय महत्त्वाकांक्षांचे धुमारे फुटू लागले आहेत; पण निवडणूक लढणे त्यांना कमीपणाचे वाटते. निवडणुकीविना त्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान हवे आहे. केवळ अण्णा आंदोलनानेच हे दाखवून दिले नाही तर सोनिया गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सल्लागार समितीनेदेखील हेच सिद्ध केले आहे. यूपीए सरकारच्या या सल्लागार समितीत स्वयंसेवी संस्था सामील असून ही सल्लागार समिती आपले निर्णय निर्वाचित सरकारवर लादण्यास नेहमीच उत्सुक राहिली आहे. केंद्र सरकारचे अनेक निर्णय रेंगाळत पडण्यामागे स्वयंसेवी संस्थांचा प्रभाव असलेली ही सल्लागार समितीदेखील कारणीभूत आहे. केंद्रसरकारने काही स्वयंसेवी संस्थाना महत्त्व देऊन सल्लागार समितीत सामील करून प्रतिस्पर्धी स्वयंसेवी संस्थांची नाराजी ओढवून घेतली आहे. केंद्र सरकारने केजरीवाल यांना आधीच सल्लागार समितीत सामील करून घेतले असते तर केंद्र सरकारला खच्ची करणारे अण्णा आंदोलन उभेच राहिले नसते. अण्णा आंदोलन उभे राहण्यामागे स्वयंसेवी संस्थामधील प्रतिस्पर्धा हे कारण नक्कीच नगण्य नाही. स्पर्धा आणि राजकीय आकांक्षा असणे वाईट नाही; पण मागच्या दाराने सत्तेच्या दालनात प्रवेश करणे नक्कीच चुकीचे आहे. नवा राजकीय पर्याय उभा करण्यात या संस्थांनी शक्तीपणाला लावली तर त्यांची महत्वाकांक्षाही पूर्ण होईल आणि विकासविरोधसुद्धा पुसट होईल.

■■

# शेतकरी आंदोलनाला बीटीचा अपघात

बीटी बियाणाचे वाण भारतात रुजून १० वर्षे झालीत. हे वाण भारतात येण्याआधीपासून याच्या बऱ्या-वाईट परिणामांवर घनघोर चर्चा सुरू आहे. बीटी बियाणांमुळे भारतीय शेतीची आणि पर्यावरणाची न भरून येणारी हानी होईल या टोकापासून ते बीटीशिवाय भारतीय शेती तग धरणार नाही या टोकापर्यंत चर्चेच्या व वादाच्या फेऱ्या झडत राहिल्या. शेतकऱ्यांनी मात्र या वादाकडे अधिक परिपक्वतेने पाहिले. जुन्या वाणाचा अनुभव पाठीशी असल्याने आणि त्यातून आता अधिक मिळकतीची आशा उरली नसल्याने नव्या वाणाचा अवलंब करण्याशिवाय अधिक चांगला आणि व्यावहारिक पर्याय त्याच्याकडे नव्हता. हरितक्रांतीचा अनुभव घेऊन झाला होता. हरितक्रांतीने देशाची अन्नधान्याची गरज भागविली; पण शेतकऱ्याच्या आणि त्याच्या कुटुंबियांच्या कोणत्याच गरजा हरितक्रांतीने पूर्ण झाल्या नाहीत. जास्त पीक घेण्याच्या प्रयत्नात रासायनिक खते आणि कीटकनाशके व पाणी याचा अतिवापर झाल्याने शेतीच्या उत्पादकतेवर व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने नवे काहीतरी केले पाहिजे ही प्रेरणा बलवत्तर होत गेली. अशा परिस्थितीत बीटी कापसाच्या बियाणांचा शेतकऱ्यांनी अविलंब व हातोहात स्वीकार केला. शेतकऱ्याची जी परिस्थिती होती त्यात अधिक वाईट व्हायला काही वावच नव्हता. त्यामुळे आणखी वाईटाची भीती नव्हती. झालीच तर कीटकनाशकाच्या वाढत्या आणि खर्चिक फवारण्यांपासून सुटका होण्याची शक्यता होती. बीटीवाणाच्या विरोधाचा शेतकऱ्यावर परिणाम झाला नाही तो याचमुळे. जुन्या सर्व बियाणांचे उच्चाटन करून कापसाच्या बीटी बियाणांनी कापूस शेतीवर कब्जा केला. बीटीतूनदेखील फारसे हाती लागत नाही हा अनुभव घेऊन शेतकरी पुन्हा नव्याच्या शोधात आहे; पण बीटी बियाणांचा भारत प्रवेश होण्याआधीपासून सुरू झालेली चर्चा मात्र अजूनही त्याच त्याच मुद्द्यांवर सुरू आहे. बीटी बियाणांच्या समर्थकांच्या आणि विरोधकांच्या कुस्तीचे फड अजूनही रंगतात. वास्तविक १० वर्षांच्या अनुभवानंतर बीटी बियाण्याच्या उपयोगितेवर आणि उणीवांवर चर्चेची गरज असताना चर्चेऐवजी वादच झडत आहेत. या वादाला प्रारंभी तात्विक संघर्षाचा आणि बियाणे व कीटकनाशकांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या हितसंबंधातील संघर्षाचे कंगोरे होते. नंतर या वादाला संघटनात्मक स्वरूप आले. संघटनांना एकमेकांना कमी लेखण्यासाठी किंवा संपविण्यासाठी बीटी बियाणांचे निमित्त मिळाले. आधीपासूनच बहुराष्ट्रीय कंपन्याच्या विरोधात असणाऱ्या गटांनीदेखील या वादात हात धुऊन घेतले. आता तर शेती निरक्षर असलेली प्रसारमाध्यमेदेखील आपल्या स्वार्थासाठी या वादात उतरली आहेत. किंबहुना बीटी बियाण्यांसंबंधी महिनाभरापूर्वी जो ताजा वाद रंगला त्यामागे देशातील दोन मोठ्या आणि प्रतिष्ठीत अशा वृत्तपत्र समूहांमधील स्पर्धा कारणीभूत ठरली आहे. महिनाभरापूर्वी डाव्या पक्षाचे खासदार वासुदेव आचार्य यांच्या नेतृत्वाखालील संसदीय समितीने यवतमाळ जिल्ह्यातील विशिष्ट गावांना ठरवून भेट दिली त्यामागे हिंदू आणि टाईम्स ऑफ इंडिया या दोन वृत्तपत्रांतील स्पर्धा आणि संघर्ष कारणीभूत होता याची फारच थोड्या लोकांना कल्पना असेल. अशाप्रकारे विशिष्ट हेतूने बीटी बियाणांच्या वादाला खतपाणी घालून दोन्ही बाजूत आपापला जो निष्कर्ष शेतकऱ्यांच्या समोर मांडू पाहात आहेत ते बघता शेती आणि शेतकऱ्यांच्या हलाखी बाबत अतिशय तकलादू, वरवरची आणि चुकीची कारण मीमांसा केली जात असल्याची पुष्टी होते. यातून शेतकऱ्यांची दिशाभूल होण्याचा धोका तर आहेच; पण त्यापेक्षाही गंभीर धोका

शेतकरी चळवळ दिशाहीन होण्याचा आणि भरकटण्याचा आहे. किंबहुना या दोन वृत्तपत्र समूहांमधील वादाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेऊन शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते व नेते यांनी जी भूमिका हिरीरीनेच नव्हे तर अरेरावीने मांडली त्यावरून शेतकरी चळवळ भरकटत चालल्याची पुष्टीच होते असे विधान केले तर ते अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

### वाद आणि त्याचा निष्कर्ष

बीटी बियाण्यासंबंधीचा ताजा वाद 'टाइम्स ऑफ इंडिया'चे नाक कापण्यासाठी 'हिंदू' दैनिकाने उकरून काढला आहे. २००८ साली बीटी कॉटन बियाणे उत्पादक कंपनीने नागपूरच्या पत्रकारांना बीटी कॉटनची शेती दाखविण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील काही गावांचे दर्शन घडविले. त्यावर आधारित एक वृत्तांत तेव्हा 'टाइम्स ऑफ इंडिया'त प्रकाशित झाला होता. हा वृत्तांत कंपनीला अनुकूल असल्याने पुन्हा छापून आणण्यासाठी जाहिरातीचा मार्ग निवडला. जाहिरात म्हणून हाच मजकूर कंपनीने सलग दोन वर्षे दोनदा छापून आणला. मूळ जो वृत्तांत होता त्यात बीटीमुळे कापसाचा उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढल्याचा दावा करण्यात आला होता. त्यात १-२ गावांचा उल्लेख करून तेथे शेतकरी आत्महत्या न झाल्याचे श्रेय बीटी कॉटनला देण्यात आले होते. एखाद्या गावावरून असा निष्कर्ष काढणे चुकीचे, दिशाभूल करणारे व अवैज्ञानिक असल्याने हा मजकूर प्रसिद्ध झाला तेव्हाच त्यावर आक्षेप घ्यायला हवा होता; पण २००८ साली कोणत्याही शेतकरी नेत्याला वा शेतकऱ्याच्या संघटनेला त्यात काही आक्षेपार्ह वाटले नाही; पण हाच मजकूर जाहिरात म्हणून प्रसिद्ध झाल्यावर 'हिंदू' दैनिकाचे लक्ष गेले आणि मग जाहिरातच नव्हे तर मूळ मजकूरदेखील प्रायोजित असल्याचे दाखविण्याचा खटाटोप झाला. त्यासाठी काही शेतकरी नेत्यांना व संघटनांना हाताशी धरून टाइम्समधील त्याच मजकुराच्या अगदी विपरीत असे चित्र उभे करण्यात आले. ज्या गावांचा जाहिरातीत उल्लेख होता त्या गावांत बीटीकॉटनमुळे शेतकरी कसा देशोधडीला लागला हे तक्रारीच्या रूपात मांडण्यात आले. कृषीविषयक संसदीय समितीने बीटीग्रस्त भागाची पाहणी करावी असा आग्रह झाला. यातून खासदारांच्या उपसमितीचा यवतमाळ दौरा आयोजित झाला. (प्रायोजित केला असे जर कोणी म्हटले तर तो संसदेचा अवमान होईल!) या समितीने जिल्ह्यातील कोणत्याही गावाला भेट दिली असती तरी शेती आणि शेतकरी यांच्या विदारक स्थितीचे दर्शन खासदारांना झाले असते; पण 'टाइम्स'च्या मजकुरात उल्लेखित गावातच त्यांना आग्रहपूर्वक नेले गेले. हीच बाब खासदारांचा दौरा हा दोन धनदांडग्या वृत्तपत्र समूहाच्या संघर्षाची परिणती असल्याचे सिद्ध करते. बीटी कॉटनमुळे शेतकरी कंगाल व कर्जबाजारी झाला असून त्यातून आत्महत्येचे प्रमाण वाढले हे दर्शविण्याचा योजनाबद्ध खटाटोप करण्यात आला. यात शरद जोशींचे कट्टर विरोधक श्री. विजय जावंधिया आणि विदर्भ जनआंदोलन समितीच्या किशोर तिवारींनी मोलाचे योगदान दिले. आपल्या बियाणांविरुद्धचा प्रचार खोडून काढण्यासाठी मग कंपनीनेसुद्धा शेतकरी नेत्यांचे दौरे प्रायोजित केले! बीटी बियाणांचे सर्वांत मोठे समर्थक असलेले शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांच्या उपस्थितीत प्रगतीशील शेतकऱ्यांच्या पंचतारांकित मेळाव्यात बीटी बियाणे शेतकऱ्यांच्या हिताचे असल्याची द्वाही फिरविण्यात आली. या निमित्ताने शेतकरी संघटनांमधील वाद आणि मतभेद तर चव्हाट्यावर आलेच; पण शेतकऱ्यांचे सर्वांत मोठे अहित बीटी बियाणांनी केले किंवा बीटीमुळेच शेतकऱ्यांचे हित साधणार आहे, असे दोन टोकाचे आणि तद्दन चुकीचे निष्कर्ष समोर मांडण्यात आले. शेतकरी चळवळीतील परस्परविरोधी मतप्रवाह एका मुद्द्यावर सहमत दिसतात आणि तो मुद्दा म्हणजे बियाणांचा! शेतकऱ्यांच्या चांगल्या किंवा वाईटासाठी बियाणेच कारणीभूत असल्याचा हा निष्कर्ष आहे. काहीजण बीटीमुळे शेतकरी देशोधडीला लागणार म्हणून चिंतीत आहेत; तर काहींना बीटीमुळे शेतकरी मालामाल होईल असे वाटते. तात्पर्य, शेती आणि शेतकऱ्यांसाठी बियाणे हा कळीचा मुद्दा आहे!

### शेतकरी आंदोलन भरकटले

शेतकरी चळवळीचे नेते आणि कार्यकर्ते बियाणांचा वाद ज्या पद्धतीने चालवीत आणि वाढवीत आहेत त्यातून निघणारा वरील निष्कर्ष म्हणजे शेतकरी आंदोलनामागील तत्त्वज्ञान नाकारणारा आहे. बियाणे चांगले की वाईट हे शेवटी शेतकऱ्याच्या अनुभवावरून ठरणार आहे. एखादी संघटना किंवा चळवळ बियाण्याच्या बाबतीत न्यायाधीशाची भूमिका घेऊ शकत नाही. बियाणांच्या प्रश्नाकडे चांगल्या किंवा वाईट या भूमिकेतून न पाहता या प्रश्नाकडे शेतकरी स्वातंत्र्याच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे. बीटीबियाणे वापरण्याचे शेतकऱ्यांना स्वातंत्र्य हवे. पण शेतकऱ्यांनी बीटी बियाणेच वापरले पाहिजे असा प्रचार कुणी

## रामचंद्र खबिले यांचे दुःखद निधन



तुंग ता. मिरज, जि. सांगली येथील शेतकरी संघटनेचे गावप्रमुख श्री. रामचंद्र अण्णा खबिले, वय ५८ वर्षे यांचे शनिवार, दि. १२ मे २०१२ रोजी विजेच्या धक्क्याने अपघाती निधन झाले. २० एप्रिल रोजीच्या वादळी पावसात शेतातील घरासमोरील मका पिकात पोलवरील वायरी खाली तुटून पडल्या होत्या. वायरमनने या तुटलेल्या वायरीतील विद्युतप्रवाह खंडीत केल्याचे सांगितले; परंतु पिकातून वायरी बाजूला काढल्या नाहीत. त्यानंतर जवळजवळ २२ दिवसांनी मका पिकात पाणी पाहण्यासाठी गेले असता या तुटलेल्या वायरीत विद्युतप्रवाह सुरू झाला होता. त्याचा धक्का बसून रामचंद्र खबिले यांचे तत्क्षणी निधन झाले. त्यांना शेतकरी संघटनेच्या वतीने रावसाहेब दळवी, संजय कोले, धनपाल गळतगे, बारोखान मुजावर, तसेच तुंगमधील संघटना व स्व.भा.प.च्या पदाधिकारी, पाईकांनी श्रद्धांजली वाहिली. श्री. रामचंद्र खबिले यांनी उसावरील झोनबंदी विरोधी आंदोलन, ऊस दरवाढ, शेतकरी कर्जमुक्ती, वीजबिल मुक्ती आंदोलनात सक्रीय भाग घेतला होता. या आंदोलनात त्यांना अटक होऊन कोर्ट केसेस झाल्या होत्या. सांगली जिल्ह्यातील आंदोलनाबरोबरच, दिल्ली मेळावा, रामेश्वर येथील आंदोलनात व संघटनेच्या अधिवेशनांना ते हजर होते. ते मनमिळावू स्वभावाचे असल्याने मोठा मित्र परिवार होता. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ असा मोठा परिवार आहे. शेतकरी संघटना त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

## नरहरी धिकले यांचे दुःखद निधन

सय्यद पिंपरी ता. जि. नाशिक येथील शेतकरी संघटनेचे बिनीचे कार्यकर्ते नरहरी धिकले यांचे २७ मे २०१२ रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांनी सय्यद पिंपरी येथे दारू दुकान बंदी आंदोलन महिलांना सोबत घेऊन केले. मा. शरद जोशी साहेबांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी शेती सोडून व्यवसाय सुरू केला. शेतकरी संघटनेच्या सर्व कार्यक्रमांना ते पत्नी व इतर महिला पाईकांना घेऊन असत. नाशिक तालुक्यात त्यांनी तरुण कार्यकर्त्यांची फौज उभी केली होती. त्यांच्या कामाच्या रेट्याने शरद जोशी तीनदा सय्यद पिंपरीला आले होते. त्यांनी वीज, पाणी, रस्ते या स्थानिक प्रश्नांवर आंदोलने केली. १९८० मध्ये कांदा आंदोलनात अटक होऊन त्यांनी नाशिक रोड- सेन्ट्रल जेलमध्ये तुरुंगवास भोगला.

शेतकरी संघटना परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

कंपनीच्या प्रायोजकत्वाखाली करू लागले तर हे स्वातंत्र्याच्या मूळ भूमिकेशी विसंगत ठरते. शेतकऱ्याला जे बियाणे - मग ते बीटीबियाणे असो की परंपरागत बियाणे असो- हवे ते उपलब्ध झाले पाहिजे इतका हा साधा प्रश्न आहे. शेतकरी कोणाचे ऐकून या बाबतीत निर्णय घेतो असे कोणी मानीत असेल तर ते नक्कीच मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहेत असेच म्हणावे लागेल. शेतकऱ्यांचे निर्णय हे अनुभवातून आणि जिवंत राहण्याच्या धडपडीतून होत असतात. बीटी कॉटनला विरोध होत असतानाही त्याला शेतकऱ्यांनी जुमानले नाही आणि आता त्याचा बीटीपासून भ्रमनिरास होत आहे आणि बीटीचे लागवडीचे क्षेत्र कमी होत आहे ते शेतकऱ्याच्या अनुभवाने; पण इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की बीटीचा अनुभव घेऊन त्याकडे पाठ फिरविणारा शेतकरी कापसाच्या जुन्या वाणाकडे वळलेला नाही. कापूस लागवडीचे क्षेत्र कमी होण्यामागे सरकारचे निर्यात संबंधीचे धोरण जसे कारणीभूत आहे तसेच बीटी वाणातील कमतरता कारणीभूत आहे. याचा अर्थ एकच होतो की शेतीक्षेत्रात शेतकऱ्याचा अनुभव लक्षात घेऊन नवनव्या संशोधनाची गरज आहे. शेतकऱ्याला मागे नाही पुढेच जायचे आहे. नव्या किंवा जुन्या वाणाचा प्रचार करीत बसण्यापेक्षा गरजेनुसार संशोधन आणि अनुकूल तंत्रज्ञान विकसित होणे शेती टिकण्यासाठी गरजेचे आहे. हवामान बदलाच्या या कालखंडात तर याची विशेष गरज आहे. हरितक्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. स्वामीनाथन यांनी शेतीत आधुनिक तंत्रज्ञान आणणे गरजेचे असल्याचा गेल्याच आठवड्यात पुनरुच्चार केला आहे. केवळ संसदेत अन्नसुरक्षा विधेयक पारित करून उपयोगाचे नाही. कारण उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाशिवाय देशाच्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण होणार नाहीत याची त्यांनी स्पष्ट शब्दात जाणीव करून दिली आहे. बियाणाच्या प्रश्नावर शेतकरी चळवळीने डोकेफोड करणे हा चळवळीचा कपाळमोक्ष करण्यासारखे आहे. शेतकरी आंदोलनाची सर्व शक्ती शेतीक्षेत्रा समोरील आव्हानाचा मुकाबला करण्यावर केंद्रीत झाली पाहिजे. शेतमालाच्या किफायतशीर भावाचा प्रश्न, शेतकऱ्याला पाहिजे असलेले बाजारस्वातंत्र्य, शेती टिकविण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि भांडवल, शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा भार नियोजनपूर्वक कमी करणे यासारखे मूलभूत, किचकट आणि गंभीर प्रश्न शेतीक्षेत्रासमोर उभे आहेत. शेतकरी चळवळ मात्र आव्हानांचा हा सागर पार करण्याऐवजी बीटीच्या डबक्यात उड्या मारून स्वतःच्या अंगावर चिखल उडवून घेत आहे.


**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/


■■

# ‘मृगधारा’ द्वैमासिकाचे प्रकाशन




**नागपूर - जगदीश बनसोड यांजकडून :** वसुंधरा प्रकाशन नागपूर तर्फे प्रकाशित ‘मृगधारा’ द्वैमासिक जूनच्या खरीप विशेषांकाचा प्रकाशन सोहळा गुरुवार, ७ जून २०१२ रोजी मृग नक्षत्राच्या दिवशी विदर्भ हिन्दी साहित्य सम्मेलन, मोरभवन, राणी झाँसी चौक, सीताबर्डी नागपूर येथे ज्येष्ठ पत्रकार उमेशबाबू चौबे, नागपूर यांच्या हस्ते पार पडला. दीप प्रज्वलन करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद माजी आमदार, माजी अध्यक्ष शेतकरी संघटना ॲड. श्री. वामनराव चटप यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून राजकुमार तिरपुडे अध्यक्ष युगांतर शिक्षण संस्था, नागपूर, डॉ. बी.एस. चिमुरकर (कृषि तज्ज्ञ), श्री. अरुण केदार जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना, माजी मंत्री श्री. रमेश गजबे व डॉ. गोविंद वर्मा उपस्थित होते. शेतकरी दिनदर्शिका नावाने प्रसिद्ध होणारे कॅलेंडर व शेती विशेषांक ‘मृगधारा’च्या प्रकाशक, मुद्रक व संपादिका सौ. अरुणा राम नेवले यांनी मासिकाबद्दलचे मनोगत व्यक्त केले. मुख्य संपादक श्री. राम नेवले यांनी प्रास्ताविक मांडले. २००५ पासून सुरू झालेले शेती विशेषांक ‘मृगधारा’ या नावाने ८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सध्या हे विशेषांक दर दोन महिन्यांनी (वर्षाला ६) प्रकाशित होत आहेत. पुढे लवकरच दर महिन्याला प्रकाशित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. श्री. अरुण केदार जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना नागपूर यांनी शेतीविषयक पुस्तकाचे महत्त्व सांगितले व आधुनिक पद्धतीने शेती करणे कसे गरजेचे आहे व त्यासाठी मृगधाराचा उपयोग शेतकऱ्यांनी जरूर करावा असे आवाहन केले. डॉ. गोविंद वर्मा यांनी शेतकऱ्यांना मूल्यसंवर्धन करून माल विकण्याबद्दल माहिती दिली. युगांतर शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष श्री. राजकुमार तिरपुडे हे स्वतः सेंद्रीय शेतीचे पुरस्कर्ते आहेत. आपला माल गुणवत्तेचा तयार करून ग्राहकांपर्यंत कसा पोहचविता येईल याची माहिती दिली.

७ जूनपासून बहुतेक शेतकरी शेतीच्या कामांची सुरुवात करतात हे लक्षात घेऊन डॉ. बी.एस. चिमूरकर यांनी सोयाबीन, कापूस व तूर या पिकांच्या लागवडीबद्दल थोडक्यात माहिती दिली व या पिकांपासून चांगले उत्पादन कसे घेता येईल याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. ज्येष्ठ पत्रकार श्री. उमेशबाबू चौबे यांनी ग्रामीण भागातील वाईट परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. पिण्याचे पाणी आणण्यासाठी २ किलोमीटरपर्यंत पायी जावे लागते; परंतु माणसाचे आयुष्य उद्ध्वस्त करून देणारी दारू गावात २-४ ठिकाणी मिळून जाते, ही परिस्थिती घातक आहे. सरकारी योजना यासाठी कारणीभूत आहे. ही परिस्थिती आटोक्यात आणणे गरजेचे आहे, तरच शेतकऱ्याचे कल्याण होईल, असे त्यांनी सांगितले. सर्वांत शेवटी माजी आमदार, माजी अध्यक्ष शेतकरी संघटना (महा. राज्य) यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी पारंपरिक शेरोशायरी व मराठी, हिंदी म्हणींच्या माध्यमांतून श्रोत्यांना बांधून ठेवले. कुठलीही क्रांती विचारांना मजबूत करूनच तयार होत असते. शेतकऱ्यांनी आपले विचार आपल्या पद्धतीत बदल करून पुढे येण्याचे प्रयत्न करावे. आधुनिक शेती करताना बाजारातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. तरच त्यांना आपला पाया मजबूत करून पुढच्या काळातील शेती वाढविता येईल. नागपूर विभागातील काही निवडक शेतकरी श्रीकांत जायस्वाल (हळद), श्री. कमलेश्वर बुराडे (बासमती), श्री. प्रमोद डाखळे (शेडनेट), सौ. माया बागडे (बचत गट) तसेच कृषि पर्यवेक्षक श्री. श्याम घारपुरे व श्री. देवळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच त्यांच्या कामाची माहिती उद्धृत करण्यात आली. वसुंधरा प्रकाशनच्या मार्केटींग मॅनेजर सौ. रश्मी दादुरिया यांनी आभार प्रदर्शन केले. तर कार्यक्रमाचे संचालन श्री. जगदीश बनसोड यांनी केले.

# जाहीर निमंत्रण

## www.sharadjoshi.in अर्थात 'योद्धा शेतकरी'

### या संकेतस्थळाचा (website)

# उद्‌घाटन समारंभ




**प्रिय मित्र,**

**स. न. वि. वि.**

**www.sharadjoshi.in** अर्थात **'योद्धा शेतकरी'** या संकेतस्थळाचा (website) उद्‌घाटन समारंभ आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त ज्येष्ठ पत्रकार तथा नवभारत टाइम्सचे माजी संपादक **मा. वेदप्रतापजी वेदीक** यांच्या शुभहस्ते दि. २२ जुलै २०१२ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

**प्रमुख अतिथी**

**मा. शरद जोशी,** शेतकरी संघटना प्रणेते

**प्रमुख उपस्थिती**

**मा. रविभाऊ देवांग,** अध्यक्ष, शेतकरी संघटना

**मा. वामनराव चटप,** अध्यक्ष, स्वतंत्र भारत पक्ष

**मा. सरोजताई काशीकर,** अध्यक्ष, महिला आघाडी, स्वभाप

**मा. शैलजाताई देशपांडे,** अध्यक्ष, महिला आघाडी, शेतकरी संघटना

*सर्व पाईकांनी अगत्याने उपस्थित राहावे ही विनंती.*

*विनित : शेतकरी संघटना, स्वभाप, महिला आघाडी, युवा आघाडी, वर्धा जिल्हा.*

**दि. २२ जुलै २०१२ / वेळ : दुपारी १ वाजता / स्थळ : गुजराती भवन, हवालदारपुरा, वर्धा**

**संपर्क: गंगाधर मुटे मो. ९७३०५८२००४, दत्ता राऊत मो. ८३०८८६८३७०, धोंडबा गावंडे मो. ९४२००६२८७६**